'जय भवानी जय शिवाजी'चा रायगडात जयघोष



पान ८ वर

# कृषीवल

रायगड ॥ रविवार, दिनांक २० फेब्रुवारी २०२२

किंमत ४ ₹

पान ६ वर



महत्त्वाचे

## शिवज्योतवाहकांच्या दुचाकीला अपघात

। महाड । प्रतिनिधी ।

किल्ले रायगड येथे शिवज्योत आणण्यासाठी रात्री भोर घाटमार्गे महाडकडे येत असलेल्या दुचाकीस्वाराचे पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास गाडीवरील नियंत्रण सुटून वाघजाई मंदिराच्या पुढे दुचाकी २०० फूट खोल दरीत कोसळली. मात्र, दैव बलवत्तर म्हणून खोल दरीत कोसळूनही हे तिघेही वाचले. पुढे गेलेल्या त्यांच्या साथीदारांनी मागे येऊन त्यांचा शोध घेतल्यानंतर ते दरीत कोसळल्याचे लक्षात आले. शिवज्योत आणण्यासाठी येणारे शिवभक्त स्थानिक नागरिक यांच्या मदतीने या तिघांना शर्थीचे प्रयत्न करून बेशुद्धावस्थेत दरीतून बाहेर काढले. याबाबतचे पान २ वर

## दहशतवाद्यांदी हल्ला; दोन जवान शहीद

। श्रीनगर । वृत्तसंस्था ।

जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी यांच्याविरोधात लष्कर आणि सुरक्षा दल यांची जोरदार धुमश्चक्री झाली. शनिवारी काश्मीरमधील शोपियानमध्ये ही चकमक झाली. त्यात एका दहशतवाद्याचा खात्मा झाला आहे. मात्र, या चकमकीत सुरक्षा दलाचे दोन जवानही शहीद झाले. ही चकमक शोपियानच्या जैनापोरा येथील चेरमार्ग गावात झाली. सुरक्षा दलाकडून उशिरापर्यंत शोधमोहीम सुरू होती.

# मार्चनंतर महाराष्ट्र अनलॉक

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे संकेत

। पुणे । वृत्तसंस्था ।

**राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाला आहे. कोरोनाची तिसरी लाट ओसरली आहे. त्यामुळे राज्यात लवकरच अनलॉक झालेले पाहायला मिळेल. याबाबतचे संकेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिवनेरी किल्ल्यावरील शिवजयंती कार्यक्रमात दिले. कोरोनाचे सावट असल्याने सगळ्या शिवप्रेमींना इथे येता आले नाही. परंतु, लवकरच हे सावट दूर होईल आणि सगळे इथे येऊ शकतील, असे अजित पवार म्हणाले.**



कोरोना नियमांचे पालन करा. शिवाजी महाराजांनी घालून दिलेल्या मार्गावर आपल्याला वाटचाल करायची आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्माला ४०० वर्षे होत आली आहेत. तरीदेखील त्यांच्याबद्दलचा अभिमान, प्रेम, आदर प्रत्येक पिढीत वाढतच गेला आहे, असे यावेळी अजित पवार म्हणाले.

दरम्यान, कोरोनाचा संसर्ग कमी झाला आहे. तिसरी लाट ओसरली आहे. त्यामुळे राज्यात मार्चनंतरच शंभर टक्के अनलॉक होण्याची शक्यता आहे. तिसरी लाट आटोक्यात आल्यानंतरही दररोज शेकडो रूग्णांची नोंद होत आहे. त्यामुळे राज्याच्या टास्क फोर्सने सावध पवित्रा घेतला आहे. त्यामुळे मास्कमुक्तीचा निर्णयही मार्चनंतरच होणार आहे. ब्रिटनमध्ये डेल्टाक्रोनसारखा नवीन व्हेरियंट आढळला आहे. यामुळे अजून थोडा वेळ अनलॉक करण्यासाठी घेतला जाणार आहे, असे उपमुख्यमंत्री पवार यांनी स्पष्ट केले.

### निर्बंधातून लवकरच सुटका

**कोरोना निर्बंधात शिथिलता आणण्याच्या सूचना राज्यांना केंद्र सरकारने केल्या आहेत. त्यानुसार हालचाली सुरु झाल्या आहेत. मात्र, राज्य सरकारने सावध पवित्रा घेतला आहे. दरम्यान, लवकरच कोरोनाच्या निर्बंधातून लवकरच सुटका होण्याची शक्यता आहे.**

## जेएसडब्ल्यूविरोधातील तक्रारीची हरित लवादाकडून दखल

# गुन्हा दाखल करण्यास पोलिसांची टाळाटाळ

## पंडित पाटील यांच्याकडून नाराजी

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

जेएसडब्ल्यू कंपनीच्या वायू प्रदूषणानंतर सुरु झालेल्या ध्वनी प्रदूषणाविरोधात शेकाप नेते माजी आमदार पंडित पाटील यांनी जिल्हाधिकारी कार्यालय तसेच पोयनाड पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. ही तक्रार रायगड पोलिसांकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर करण्यात आली. त्या तक्रारीची दखल घेत जेएसडब्ल्यूच्या प्रदूषणाविरोधात हरित लवादाने पाच सदस्यीय संयुक्त समितीमार्फत चौकशी सुरु असून, त्रुटींच्या अनुषंगाने कारणे दाखवा नोटीस बजावली. मात्र, अजूनही पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याबाबत पंडित पाटील यांनी नाराजी व्यक्त केली आहे.



याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पंडित पाटील यांच्या तक्रारीबाबत लेखी पत्र दिले आहे. त्यानुसार अपर जिल्हादंडाधिकारी, अलिबाग-रायगड यांचे आपल्या सहपत्रासह दि. २८ जानेवारी २०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाले. या पत्रामध्ये कंपनीमधून मोठ्या प्रमाणावर प्रदूषित वायू व धूळ सोडल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने या कार्यालयास यापूर्वी काही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींच्या अनुषंगाने या कार्यालयामार्फत जेएसडब्ल्यू कंपनीची २९ जानेवारी २०२२ रोजी पाहणी केली. या पाहणीमध्ये आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने या कारखान्यास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. हरित लवादाकडे समिता राजेंद्र पाटील विरुद्ध जेएसडब्ल्यू व इतर यांची याचिका दाखल असून, या प्रकरणात राष्ट्रीय हरित लवादाने (२७ मे २०२१) दिलेल्या आदेशान्वये सचिव, पर्यावरण, वन आणि जलवायू परिर्वतन मंत्रालय, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली पान २ वर

# महानकरांचा पाणीप्रश्न मिटणार

## आ. जयंत पाटील यांच्या माध्यमातून बोअरवेलचे भूमीपूजन

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

महान गावात असलेली पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांच्या माध्यमातून पाण्याची बोअरवेल मंजूर करून देण्यात आली. त्याचे भूमीपूजन करण्यात आले. यामुळे महानकरांना भेडसावणारा पाणीप्रश्न कायमचा मिटणार आहे.



याप्रसंगी वेळी शेतकरी कामगार पक्षाचे पुरोगामी युवक संघटना तालुका अध्यक्ष विक्रांत वार्डे, जिल्हा परिषद सदस्य मधू पारधी, प्रकाश बसुदे, मोहन धुमाळ, मधू ढेबे, महेश झावरे, गणेश कानोजे, रामराज ग्रामपंचायत सदस्य कीर्ती कनोजे, माजी उपसरपंच वसंत कांबळे, नंदकुमार चिखले, नरेश भांडविलकर, अनुराज चिखले, अनिकेत चिखले, सर्वेश रसाळ, राजू धनावडे, संकेत धनावडे, ऋषी धनावडे, केतन धनावडे, दीपक पाटील, पान २ वर

# जिल्ह्यात शिवजयंती उत्साहात साजरी

## अलिबागमध्ये नगराध्यक्षांकडून छत्रपतींना मानवंदना



। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती शनिवारी संपूर्ण जिल्ह्यात उत्साहात साजरी करण्यात आली. विविध देखावे, रॅली यासह रक्तदानासारखे सामाजिक उपक्रमही राबविण्यात आले. शिवजयंतीचा सकाळी सुरू झालेला जल्लोष रात्रीपर्यंत सुरू असल्याने एकूणच वातावरण शिवमय झाले होते. अलिबागमध्ये नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करुन मानवंदना दिली.

संबंधित वृत्त पान ३/८ वर

## भाजप-शिवसेनेत पुन्हा राडा

### जलतरण तलावाच्या श्रेयवादाचे राजकारण



। मुंबई । वृत्तसंस्था ।

मुंबईतील कांदिवलीमध्ये सरदार वल्लभभाई पटेल जलतरण तलावाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमावरुन शिवसेना-भाजपमध्ये पुन्हा एकदा मोठा गदारोळ झाला. शनिवारी हा उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. तलावाच्या श्रेयवादावरुन जोरदार राडा होऊन दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते आमनेसामने आल्याचे दिसून आले.

कांदिवलीत सरदार वल्लभभाई पटेल जलतरण तलावाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम उद्या २० फेब्रुवारीला पान २ वर

आयुर्वेदिक खो-गो®

60 YEARS OF TRUST

कफ-पिल्स

खोकल्यावर अत्यंत गुणकारी गोळ्या



कोरडा खोकला

घशातील खवखव

घसा दुखणे

ह्यावर गुणकारी

सर्व केमिस्टमध्ये उपलब्ध

कफ सुटून घशाला त्वरीत आराम मिळतो.

TRADE MARK अहिल्या आयुर्वेदिक औषधालय, मुंबई ६३.

HelpLine No:+91 8108130009 • www.khogo.in

## मजुराचा मृत्यू

। महाड । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यातील कोल या गावाजवळ असलेल्या श्रीराम स्टोन क्रशर या दगडाच्या खाणीमध्ये शुक्रवारी संध्याकाळी डंपर आणि क्रशर यामध्ये सापडून एक मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. अनिल पवार (४९) असे त्याचे नाव आहे. या घटनेची नोंद महाड शहर पोलीस ठाण्यामध्ये करण्यात आली असून, पोलिसांनी केवळ डंपर चालकाच्या विरोधामध्ये गुन्हा दाखल केला आहे. वास्तविक क्रशर मालकाच्या हलगर्जीपणामुळे हा अपघात घडला असल्याची चर्चा कोल परिसरामध्ये करण्यात येत असून, क्रशर मालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी केली जात आहे.



हनुमान उपासक प्रख्यात ज्योतिषाचार्य...

पंडितजी शिवाजी शास्त्री

हरिद्वार, नाशिक, त्र्यंबकेश्वर येथून जनतेच्या आग्रहामुळे अलिबाग येथे आलेले आहेत.



दुवा भी तकदीर बदल देती है। कोशिश हर बंद दरवाजा खोल देती है।

गुरुवार दि. १७-०२-२०२२ ते बुधवार दि. २३-०२-२०२२ पर्यंत संपर्क साधा..

पंडितजी स्त्री पुरुषांना कोणत्याही समस्यांवर ज्योतिष शास्त्र आणि वास्तू शास्त्राच्या आधारे मार्गदर्शन व निवारण करतात. आपला चेहरा, हस्त रेखा, जन्म कुंडली, जन्म तारीख किंवा फोटो निरीक्षण करुन भविष्य सांगतात. आपली नोकरी, व्यापार, उद्योगधंदा, कोर्ट, कचेरी, कुटूंबातील कलह, संतान सुख, नोकरी, प्रेम विवाह, शारीरिक दोष निवारण, कालसर्प दोष, ग्रहांची बाधा, निवारण किंवा आपली उन्नती कोणत्याही दोषामुळे होत नाही. यावर उपाय सांगतात, नारायण नागबळी विषयी मार्गदर्शन, शनी, मंगळ, गुरु या ग्रहांची पीडा, रुद्र अभिषेक, नवचंडी पाठ, मृत्युंजय जप, सप्तपदी पाठ, शनि अभिषेक, राजनिती अशा अनेक कठीण समस्येवर उपाय करुन मानसिक व शारिरीक कष्ट दूर करतात. स्त्री पुरुष दो, स्थावर मालमत्ता, प्रॉपर्टी संदर्भात योग्य मार्गदर्शन, अभ्यासात मन न लागणे, शत्रु परेशानी, मुला मुलीचे विवाह होत नाहीत. संबंध तुटतात, कुलदेवताचा दोष, मकान, दुकान, आदी यावर उपाय सांगतात कोणतेही प्रश्न शास्त्राच्या आधारावर सांगतात.

**सूचना** - शनि रक्षा कवच, नजर सुरक्षा कवच, नवग्रह राशीचे खडे, प्राणप्रतिष्ठा सर्व प्रकारची विधी हनुमान दादाच्या कृपेने सिद्धी करुन मिळेल. संतान सुखासाठी पती पत्नी दोघांनी भेटावे. व्यसनमुक्तीवर मार्गदर्शन मिळेल. सर्व पुजा पाठ शास्त्रीय पद्धतीने केल्या जातील. ज्यांची जन्म कुंडली असेल त्यांची अवश्य घेऊन येणे.

पत्ता- हॉटेल गुरुजी, रुम नं. १०८, अलिबाग बिच, ता. अलिबाग, जि. रायगड

आपले प्रश्न आपल्यापर्यंत असतील, पंडितजी केवळ ३ प्रश्नांचेच उत्तर देतील.
भेटण्या अगोदर आपली वेळ फोनवर निश्चित करा.
मोबाईल :- ८७६७८७३२६८

भेटण्याची वेळ
सकाळी ९.०० ते सायं. ६-००
भविष्य पाहण्याची फी रु. १०१/- मात्र

लुकमाने हयात तेल®



भाजणे, पोळणे, कापणे, मुरगळणे, सुजण, मुकामार, मुळव्याध, जखमा, अंगमसाज या वेदनांवर गुणकारी।

Mfg. By: M/s. M.U. Amrelia, MUMBAI. • Tel.: 022-23441456 • www.lookmanehayattel.com | सर्व स्टोअर्स आणि केमिस्ट मध्ये उपलब्ध

शुभारंभ

ARIHANT SUPERSTRUCTURES LTD
CONTINUING STABILITY
www.asl.net.in



THE O FACTOR

तुमच्या नवीन घरी तुमच्या खाजगी ऑफिसचे स्वागत करा

नवी मुंबई मध्ये पनवेल येथे प्रथमच सादर करत आहे

1 BHK-O : 47 लाख +* | 2 BHK-O : 67 लाख +*

16 - ACRE टाउनशिप आधुनिक क्लब हाऊस आणि सर्व अत्याधुनिक सुविधांसह

प्राइवेट ऑफिस स्पेस* | 2 Acres लँडस्केप गार्डन | बँक्वेट हॉल

ओझोना - ओझोन पूल अँड जकुझी | मिनी थिएटर | कव्हर्ड बॅटमेंटन कोर्ट

सच में कुछ बदल रहा है Changing Lifestyle BY ARIHANT HOMES

अरिहंत सुपरस्ट्रक्चर्स लिमीटेड | BSE, NSE लिस्टेड कंपनी | सर्वात विश्वसनीय रिअल इस्टेट ब्रँड

08069250008

MahaRera No.: P52000014107 | www.maharera.mahaonline.gov.in

स्कॅन करा

*अटी लागू

महत्वाची सूचना : या जाहिरातीत दाखवलेली सर्व रेखाचित्रे, सोयी, सुविधा, दर इत्यादी संबंधित अधिकाऱ्यांच्या मान्यतेनुसार बदलू शकतात. अंतिम निर्णय हा विकासकांकडे राहतो.

## अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२० फेब्रुवारी**

१) श्री. केशव बंडू पांचाळ
२०-०२-१९४५
पांचाळवाडी, अलिबाग
२) श्री. प्रकाश सदाशिवराव जोशी
२०-०२-१९४४
अलिबाग
३) श्रीम. विभा वसंत म्हात्रे
२०-०२-१९५२
बामणोली, अलिबाग
४) श्री. सुरेश जिवाजी विलणकर
२०-०२-१९५७
ब्राह्मण आळी, अलिबाग

# श्रीवर्धनमधील म्हाब्धा घाटातील जंगलात वणवा

## वनविभागाच्या उदासीनतेमुळे तात्काळ उपाययोजना नाहीच

**। दिघी । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील वावेपंचतन हद्दीतील रस्त्यालगत असलेल्या जंगलात वणवा लागल्याने कित्येक लहान-मोठी झाडे जळून नष्ट झाली आहेत. येथील वनविभागाच्या दोन हेक्टर क्षेत्रातील डोंगराला लागलेल्या वणव्यात पशु-पक्षी, सरपटणाऱ्या प्राण्यांसह जनावरांचा चारा नष्ट झाला आहे. यावेळी मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची घटना घडली असताना, वनविभाग



याकडे दुर्लक्ष करीत असल्याची बाब समोर आली आहे.

वावेपंचतन परिसरातील म्हाब्धा घाटातील वनविभागाच्या हद्दीत वणवा लागला. या वणव्यात जवळपास दोन ते तीन हेक्टर परिसर जळून खाक झाल्याचे प्रत्यक्षदर्शीने सांगितले. वनविभागाच्या ढिसाळ कारभारामुळे जाळपट्टे काढले जात नाहीत, यामुळे डोंगरच्या डोंगर आणि वनविभागाच्या हद्दीतील झाडे या वणव्यांच्या भक्ष्यस्थानी पडत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. येथे दिवसा लागलेल्या वणव्याकडे वनविभागाचे कर्मचारी फिरकलेच नाही.

**वनविभागाचे दुर्लक्ष**

**शासन एकीकडे झाडे लावण्यासाठी प्रचंड अनुदान देते, यासाठी जनजागृती करीत वृक्ष लावगड करते आणि दुसरीकडे त्याची जोपासना करणारे वनविभागात काम करणारे कर्मचारी याकडे मोठे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे जंगलसंपत्तीचे मोठे नुकसान होत आहे. शासन दरवर्षी वणवे लागू नये यासाठी मोठ्या प्रमाणात सूचना देते. जाळपट्टे काढण्यासाठी निधी देते, मात्र जाळपट्टे वेळेत आणि आवश्यक त्या ठिकाणी काढले जात नसल्याने वणवे लागण्याची प्रमाण वाढत आहे.**

**“गावांपासून निर्जन ठिकाण व क्वचितच रस्त्यावरून जाणारे प्रवासी वाहन असल्याने वणवा विझवण्यासाठी प्रयत्न झाले नाहीत. अशातच पाऊण तास उलटून गेला तरी वनविभागाचे अधिकारी वणव्या ठिकाणी पोहोचले नाहीत.**

**– वैभव खोत, प्रवासी**

## महत्त्वाचे

## राकेश पाटील यांना पितृशोक

**। उरण । वार्ताहर ।**

तालुक्यातील साईकृपा इन्फॉ. टेक्नॉलॉजी कोप्रोलीचे संस्थापक राकेश पाटील यांचे वडील लक्ष्मण सहदेव पाटील यांचे प्रदीर्घ आजाराने शुक्रवार, दि. १८फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांचे दशक्रिया विधी रविवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी श्रीक्षेत्र माणकेश्वर उरण येथे, तर उत्तरकार्य (१३ वे) सोमवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी राहत्या घरी होणार आहे.



## ‘मधुबनचे कविसंमेलन वृद्धांसाठी आनंददायी’

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

को.म.सा.प. मधुबन कट्ट्यावर आमचा आनंद वाढविणारे कविसंमेलन ऐकण्यासाठी येतो, असे उद्गार कोमसाप उरणतर्फे विमला तलावावर दि. १७ फेब्रुवारी रोजी झालेल्या कविसंमेलनाचे वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रकांत मुकादम यांनी काढले.यावेळी बाळाराम म्हात्रे, सूर्यकांत दांडेकर, रमेश सूर्यवंशी, श्री. घरत, मारुती तांबे, मोहन म्हात्रे यांनीही आपले विचार व्यक्त केले.

कविसंमेलनात रायगड भूषण प्रा. एल.बी. पाटील, भ.पो. म्हात्रे, संजय होळकर, रामचंद्र म्हात्रे, अजय शिवकर, वसंत राऊत, नामदेव बरतोड, संग्राम तोगरे इ.नी आपल्या कविता सादर केल्या. ज्येष्ठ नागरिक रमेश माळी, संजय चिंबळकर, भुवनेश्वर पाटील, अनिल म्हात्रे, माधव शेलार, नारायणराव, दत्ता निळवर्ण, चंद्रकांत म्हात्रे, राम पाटील इ.नी कवींच्या सुरेख व सुरेल कवितांचा आनंद घेतला. संजय होळकर यांनी सूत्रसंचालन केले.

## वडखळ सरपंचावर कारवाईची टांगती तलवार

**गुरुवारी होणार सुनावणी**

**। पेण । वार्ताहर ।**

वडखळ ग्रामपंचायतीचे सरपंच राजेश मोकल यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार केल्याची तक्रार ग्रा.पं. सदस्य विवेक म्हात्रे व विनोदिनी कोळी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे. त्या अनुषंगाने २२ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.३० वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात सुनावणी होणार आहे.

या सुनावणीच्या वेळी विवेक म्हात्रे व विनोदिनी कोळी यांनी जे आरोप केले आहेत, त्यामध्ये ग्रामपंचातीने विलास पवार यांना कचरा ठेकेदार म्हणून लाखो रुपयांची रक्कम बेकायदेशीररित्या अदा करणे, त्यानंतर ग्रामपंचायतीने वसूल केलेल्या ४ लाख ७८ हजार ५३९ रु. ग्रामनिधीमध्ये जमा न करता परस्पर रोखीने खर्च करणे, मासिक सभेत सदस्य हजर नसताना सूचक व अनुमोदक म्हणून नावे दाखविणे, विहीर दुरुस्ती कामामध्ये रोख रकमा देणे, यासह इरतही केलेल्या आरोपासंदर्भात परिपूर्ण माहितीसह सुनावणीला हजर राहण्याचे पत्र उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) रायगड जिल्हा परिषद यांच्याकडे आले असून, सदरील प्रकरण राजेश मोकल यांच्या अंगलट येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषदच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादीकडून राजेश मोकल हे संभाव्य उमेदवार म्हणून नाव पुढे येत आहे; परंतु जर ग्रामपंचयात भ्रष्टाचारप्रकरणी राजेश मोकल यांच्यावर कारवाई झाल्यास पुढील राजकीय प्रवास कठीण झाल्याशिवाय राहणार नाही. राजेश मोकल यांच्यावर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा मुंबई अधिनियम क्र.३) कलम ३९ (१) नुसार कारवाइची टांगती तलवार आहे.

## पनवेल मनपा हद्दीत इंग्रजी माध्यमाच्या शाळा

**॥ प्रीतम म्हात्रे यांच्या पाठपुराव्याला यश**

**॥ महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेमार्फत मनपा हद्दीत विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याचा ठराव पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला आहे. पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे पालिका हद्दीत इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याची मागणी केली होती. त्यांच्या मागणीला यश आले आहे.



पनवेल महानगरपालिकेमार्फत सद्यःस्थितीत ११ शाळा चालविण्यात येत आहेत. यापैकी ८ मराठी माध्यमाच्या शाळा, २ उर्दू व १ गुजराती शाळा आहेत. मात्र, अद्याप पनवेल महानगरपालिकेची इंग्रजी माध्यमाची शाळा नाही. मनपाच्या सद्यःस्थितीत इ.१ ते इ.७ पर्यंतच्या शाळा आहेत. पालिका हद्दीत इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याची मागणी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी केली होती. इंग्रजी माध्यमाची होणारी शाळा पूर्वप्राथमिक ते इ. दहावीपर्यंतच्या वर्गासाठी सुरू केली जाणार आहे.

## बोर्लीपंचतन शहरातील टपाल पेट्या गायब

**। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी ।**

टपाल पेट्या बसविण्याची मागणी श्रीवर्धन तालुक्यातील आदगाव येथील सामाजिक कार्यकर्ते वैभव खोत यांनी मुख्य डाक अधिकारी अलिबाग यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

बोर्लीपंचतन तेथे उपविभाग पोस्ट कार्यालयाच्या आवारात व बोलीपचतन हद्दीत कोठेही नागरिकांना पोस्टाने पत्र पाठविण्यासाठी पोस्ट पेटी नसल्याने व उपडाक बोर्लीपंचतन विभागाच्या कामकाजाची वेळ असलेले फलक कार्यालयाच्या आवारात नसल्याने नागरिकांना नाईलाजाने इतर सेवेमार्फत आपले पत्र पाठवावे लागत आहे. याबाबत टपाल पेटी व कार्यालयाच्या कामकाजाची वेळ असलेले फलक त्वरित लावावी, याबाबतचे लेखी निवेदन मुख्य डाक अधिकारी अलिबाग व उपडाक विभाग अधिकारी यांना समाजसेवक व कार्यकर्ते वैभव खोत यांनी दिले आहे.





क्रीडाभवन अलिबाग येथे घरत आळी मित्रमंडळ आयोजित दुर्गाई चषक-२०२२ क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित संदीप किर व अन्य मान्यवरांसह क्रिकेट रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवजयंती ऑनलाईन साजरी

**। वर्षा मेहता।**
**। अलिबाग ।**

१६३० मध्ये जन्मलेल्या छत्रपती शिवाजी, ज्यांनी मराठा साम्राज्याची स्थापना केली, त्यांच्या शौर्यासाठी, लष्करी प्रतिभा आणि नेतृत्वासाठी ओळखले जाते. त्यांच्या जयंतीनिमित्त सोशल मीडियावर पोस्ट केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या मराठा योद्ध्याला मराठीतून आदरांजली वाहिली. पंतप्रधान मोदींनी लिहिले, ‘छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त मी त्यांना नमन करतो. त्यांचे सर्वोत्कृष्ट नेतृत्व आणि समाज कल्याणासाठीचा आग्रह अनेक पिढ्यांसाठी प्रेरक ठरला आहे. सत्य आणि न्याय या मूल्यांशी त्यांनी तडजोड केली नाही. त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.’

सोशल मीडियावर हॅशटॅग शिव जयंती, छत्रपती शिवाजी महाराज, ट्रेंड झाले. ट्विटरवर युजर्सनी मराठा योद्ध्याचे धैर्य आणि शौर्याचे कौतुक केले. भारताने पाहिलेल्या सर्वात धाडसी आणि प्रगतीशील राज्यकर्त्यांपैकी एक, छत्रपती शिवाजी यांनी मुघलांविरुद्ध अनेक युद्धे जिंकली आणि त्यांच्या प्रमुख रणनीतीमुळे मराठा साम्राज्य निर्माण केले. ते भारतातील गनिमी युद्धाचे जनक म्हणून ओळखले जातात. त्यांनी १६४५ मध्ये मुघलांविरुद्ध ‘गनिमी कावा’ किंवा ‘शिवसूत्र’ प्रवर्तित केले आणि मराठा साम्राज्याची स्थापना केली.



SOCIAL MEDIA पडसाद

## आदर्श पतसंस्थेची प्रगती प्रेरणादायी : अनिल कवडे

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी।**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेची आर्थिक स्थिती भक्कम आहे. संस्थेने केलेली प्रगती प्रेरणादायी आहे, अशी प्रशंसा राज्याचे सहकार आयुक्त व निबंधक अनिल कवडे यांनी केली.

राज्याचे सहकार आयुक्त अनिल कवडे शुक्रवारी (दि. १८) अलिबागला आले होते. त्यावेळी त्यांनी आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेला सदिच्छा भेट दिली. त्यांच्यासमवेत सहकारी संस्था अप्पर निबंधक शैलेश कोतमीरे, कोकण विभाग सहनिबंधक आप्पाराव घोळकर, मुंबई विभाग लेखापरीक्षण सहनिबंधक राम शिर्के, रायगड जिल्हा उपनिबंधक डॉ. सोपान शिंदे उपस्थित होते.



चुकीचे काम केल्यामुळे पतसंस्था अडचणीत येतात. त्यामुळे संचालक मंडळ व प्रशासनाने सजग राहून सदसदविवेक बुध्दीने काम केले पाहिजे. चांगले मापदंड निर्माण करून प्रेरणादायी काम केले पाहिजे. ग्राहकांमध्ये विश्वासाहर्ता निर्माण केली पाहिजे, असे अनिल कवडे म्हणाले. आदर्श पतसंस्थेने आता आपले काम अधिकाधिक डिजिटालायझेशन करण्यावर भर द्यावा. बँकींग संबंधित इतर व्यवसायातून नफा मिळविण्याचा प्रयत्न करावा, असा सल्ला सहकारी संस्था अप्पर निबंधक शैलेश कोतमीरे यांनी यावेळी दिला.

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश पाटील यांनी प्रास्ताविक केले. आदर्शचे उपाध्यक्ष सतीश प्रधान, सेक्रेटरी कैलास जगे, संचालक सुरेश गावंड यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. आदर्शचे संचालक अभिजीत पाटील यांनी आभार प्रदर्शन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी मीनाक्षी पाटील व मुख्याधिकारी उमेश पाटील यांनी पाहुण्यांना आदर्श पतसंस्थेची माहिती दिली.

पान १ वरून

## गुन्हा दाखल करण्यास पोलिसांची टाळाटाळ

पाच सदस्यीय संयुक्त समिती स्थापन करण्यात आली होती. त्यामध्ये केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, भारतीय प्रौद्योगिकी संस्थान मुंबई, जिल्हा दंडाधिकारी, रायगड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे सदस्य आहेत. ते प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे नमूद करण्यात आले आहे. आपल्या तक्रारीची दखल प्रदूषण नियंत्रण मंडळाने घेतल्याबाबत पंडित पाटील यांनी समाधान व्यक्त करतानाच वडखळ पोलीस ठाण्यात केलेल्या तक्रारीवर अद्यापही रायगड पोलिसांनी कोणतीच कारवाई केली नसल्याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. आतातरी पोलीस प्रशासनाने तत्परता दाखवित जेएसडब्ल्यू कंपनीविरोधात गुन्हा दाखल करावा, अशी मागणी पंडित पाटील यांनी केली आहे.

## महानकरांचा पाणीप्रश्न मिटणार

ऋतिक करंजे, रोहन कांबळे, केशव खंडागळे, अनिल पवार, नितेश पोंडके, अपेश पारधी, बोरघर ग्रामपंचायत पुरोगामी युवक संघटना अध्यक्ष अक्षय डिकले, महान आणि महानवाडी ग्रामस्थ उपस्थित होते. याप्रसंगी सर्व ग्रामस्थांकडून शेकापचे आभार मानण्यात आले.

## शिवज्योतवाहकांचा अपघात

सविस्तर वृत्त असे की, भोर तालुक्यातील भांबोडे व भोगवली या गावातील सात ते आठ तरुण शिवभक्त दुचाकीवरुन शुक्रवारी मध्यरात्रीनंतर किल्ले रायगडावर जाण्यासाठी निघाले. पहाटे तीनं वाजण्याच्या सुमारास या मित्रांपैकी प्रथमेश गरुड, प्रीतम देसाई (रा. भांबोडे, ता. भोर), किरण सूर्यवंशी (रा. भोगवली, ता. भोर) हे वाघजाई मंदिराच्या पुढे पोहोचले असता, ज्या दुचाकीवरून येत होते त्या दुचाकीस्वाराचे गाडीवरील नियंत्रण सुटून त्यांची दुचाकी दरीच्या बाजूस जाऊन २०० फूट खोल दरीत कोसळली.

पुढे गेलेल्या त्यांच्या साथीदारांनी आपले तिघे सहकारी अद्याप का आले नाहीत म्हणून ते पुन्हा माघारी येऊन त्यांचा शोध घेतला. त्यावेळी गाडीच्या चाकांच्या ठशावरून ते दरीत कोसळले असल्याचे लक्षात आल्यानंतर पाठीमागून येणारे अन्य शिवभक्त तसेच स्थानिक नागरिक यांच्या मदतीने दरीत उतरुन जखमी बेशुद्धावस्थेत असणाऱ्या या तिघांना शर्थीचे प्रयत्न करून बाहेर काढण्यात आले. या अपघाताची माहिती महाड एमआयडीसी ठाण्यास मिळताच पोलिसांची टीम घटनास्थळी पोहोचली. त्यांनी रुग्णवाहिकेतून या तिघा जखमींना महाड ग्रामीण रुग्णालयात आणले. या ठिकाणी एका रुग्णावर, तर अन्य दोघांवर रानडे हॉस्पिटल येथे उपचार सुरु आहेत.

## भाजप-शिवसेनेत पुन्हा राडा

भाजपचे आमदार योगशे सागर यांच्या हस्ते पार पडणार होता. पण, त्याआधीच शनिवारी शिवसेनेच्या महापौर किशोरी पेडणेकर यांच्या हस्ते उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. याच मुद्द्यावरुन भाजपचे आ. योगशे सागर आणि त्यांच्या कार्यकर्त्यांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला मंचावरही गदारोळ झाला.

## वकील संघटनेच्या अध्यक्षपदी नवाळे



**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुका वकील संघटनेची निवडणूक नुकतीच संपन्न झाली. या निवडणुकीत अध्यक्षपदी दत्तात्रेय नवाळे हे बहुमताने निवडून आले. ॲड. दत्तात्रेय नवाळे यांची अध्यक्षपदी निवड होताच त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

२०२२-२३ सालाकरिता निवड झालेल्या कार्यकारणीत उपाध्यक्षपदी भारती भोईर, किशोर ठाकूर, सचिवपदी प्रसाद पाटील, खजिनदारपदी अर्चना माळी, ऑडिटर संतोष पाटील, सभासद अझीमन रईस अहमद अन्सारी, वृषाली पाटील, विपुल ठाकूर, धीरज डाकी यांचा समावेश करण्यात आला आहे.


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदिनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक







जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**स्व. अनंत श्रावण पाटील,**
**स्मरणार्थ, गोळीबार मैदान, पेण**



## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

**विवाह, पुर्नविवाह सर्वजातीय** आंतरजातीय स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ. ८८८८९३५७७५, ९२७०४३३४८७

**ॲडव्हान्स लेव्हल शेअर मार्केट कोर्स,Investomax कामत आळी,** अलिबाग- ७७४४०८८४०४

**अलिबागमध्ये ११८३** Sqft फ्लॅट विकणे आहे. संपर्क : ९६८९७६७७०७

**अलिबागमध्ये हार्डवेअरच्या** दुकानात कामासाठी मुले पाहिजेत. संपर्क- ०२१४१-२९५१११/९४२२६९०८५४

**श्री सिद्धीविनायक ज्योतिष** सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग

**बोअरवेल विहिरीसाठी,** मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन - ९२२६७६६१२९

**शुभमूहूर्त विवाह मंडळ अलिबाग,** शाखेत सर्व जातीय वधूवरांची नावनोंदणी सुरू. ४२ शाखा, वेबसाईट- ९३७०५१७९४९

**अलिबागमधील फीजीओथेरपी** क्लीनिककरिता शिकावू महिला - पुरूष पाहिजेत. शिक्षणाची अट नाही- ९२२६७६६१२९

**सफाईदार इंग्लिश बोलण्याची** सर्वांची तीव्र इच्छा निश्चित पूर्ण करणारे सर्वात जुने, अनुभवी आशास्थान- ९८२२८४२८१०

**अलिबाग-चोंढी येथील** रिसॉर्टमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत. फोन-९३२३१५२९९०. Email : info@paradiseresort.in

**जाहिरातीसाठी संपर्क**
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022)


# रायगडात अवतरली शिवशाही

## सोनगिरी किल्ल्यावरून शिवज्योत



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत येथील शिवराज प्रतिष्ठानने आज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सोनगिरी किल्लयावरून शिवज्योत आणली.या शिवज्योत दौड मध्ये १५० हुन अधिक तरुण सहभागी झाले होते. बीड गावाच्या वेशीवर असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारक येथे बीड ग्रामस्थांनी शिवज्योतीचे पूजन केले.तेथून शिवज्योत दौड सुरू झाली आणि साडे अकरा वाजता कर्जत येथील आमराई पुलावर पोहचली. तेथून सर्व तरुण धावत कर्जत शहरातील बाजारपेठ, डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक अशी स्टेशन रोडने शहरातील डेक्कन जिमखाना येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारक वाजतगाजत आणण्यात आली.दिवसभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

## तळ्यात शिवजयंतीचा उत्साह

। तळा । वार्ताहर ।

तळा शहरात शिवजयंती चा उत्साह शिगेला पोहचला असल्याचे चित्र पहायला मिळाले. शिवकालीन मर्दानी खेळ, लाठी काठी, लेझीम, मशाल महोत्सव, भव्य मिरवणूक आशा विविध कार्यक्रमांनी तळा शहरात शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला. मिरवणुकीत महाराजांची वेशभूषा केलेला विद्यार्थी,आजूबाजूला भगवे झेंडे हातात घेऊन उभे असलेले मावळे, लेझीम पथक, लाठी काठी, दांनपट्टा, बाणा फिरविणारे विद्यार्थी व सर्वत्र छत्रपती शिवाजी महाराज की जय,जय भवानी जय शिवाजी चा जय जयकार आसमंत दुमदुमून गेला.

## मुरुडमध्ये बालशिवाजी

। मुरुड । वार्ताहर ।

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त मुरुड भंडारवाडा भंडारी युवक कार्यकर्ते आयोजित भव्यदिव्य शिवप्रतिमेची पालखी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी लहान मुलांनी महाराजांची व मावळ्यांची वेशभूषा साकारली होती. पालखी मिरवणूक भंडारवाडा येथून सुरू



झाली ती श्री काळभैरव मंदिर येथे जाऊन बाजारपेठेतून पुन्हा भंडारवाडा येथे जाऊन समाप्त करण्यात आली. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## म ह त्वा चे

### शिवशाहीवर व्याख्यान

। आंबेत । वार्ताहर ।

आंबेत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आंबेत शिवज्योत मित्रमंडळाचे प्रमुख महेंद्र सावंत यांच्या निवासस्थानी राजे शिव छत्रपती यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कोलाड येथील बाल शिव व्याख्याती सिद्धी पवार यांनी आंबेत येथील उपस्थित कार्यक्रमात आपल्या शिवशैलीवर व्याख्यान करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केलं.यावेळी मान्यवरांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले.कार्यक्रमास आबालवृद्ध उपस्थित होते.





## शेकापचे सुधीर पाटील बोरगावचे सरपंच

। पेण । वार्ताहर ।

पेण तालुक्यातील बोरगांव ग्रामपंचयातीच्या सरपंचपदी शेकापचे सुधीर पाटील यांची बिनविरोधी निवड करण्यात आली आहे. याआधीचे सरपंच नाना महाडिक यांनी राजीनामा दिल्याने हे पद रिक्त होते. त्यानंतर या पदासाठी निवडणूक घेण्यात आली.

यावेळी जिल्हा परिषद सभापती ॲड. निलिमा पाटील ग्रामपंचायत सदस्य डी. बी. पाटील यांनी सरपंच सुधीर पाटील यांचे स्वागत केले. सुशांत खाकर, काशिनाथ केवारी, सोमी केदारी, सोमा पारधी, संगिता वाघमारे, सीता वाघमारे, सुशिला पाटील, मधुरा महाडिक, ग्रामसेवक गणेश पाटील यांच्यासह हरेश पाटील, सचिन बेलकडे, ललित ढाकवल, माजी पोलिस पाटील भास्कर पाटील आदी उपस्थित होते. यावेळी सुधीर पाटील यांनी असे सांगितले की, माझी बिनविरोध सरपंच म्हणून निवड झाली आहे. गावाच्या विकासासाठी तरुणांना सोबत घेउन पुढची वाटचाल मी करणार आहे. आपल्या सरपंच पदाच्या काळात गावासह परिसराचा विकास करण्याचा निश्चितपणे प्रयत्न करु असे नवनिर्वाचित सरपंच सुधीर पाटील यांनी बोलताना सांगितले.

## अलिबागेत आज विजयश्री स्पर्धा

। अलिबाग । वार्ताहर ।

ज्येष्ठ नाट्यलेखक व दिग्दर्शक कै.विजय बारसे यांना अभिवादन म्हणून गेली चार वर्ष विजयश्री ही स्पर्धा फ्रायडेफिल्म्स प्रोडक्शन, अलिबाग यांच्यातर्फे आयोजित केली जाते.यावेळी ही स्पर्धा रविवारी २० फेब्रुवारीला आयोजित करण्यात आलेली आहे.

स्पर्धेची प्राथमिक फेरी ऑनलाईन पद्धतीने पार पडली तर दि.२० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता अलिबाग येथील पी.एन.पी नाट्यगृह येथे अंतिम फेरी संपन्न होणार आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी स्पर्धकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे. त्यातील ठाणे, पुणे, चिपळूण, मुंबई, पेण अशा विविध ठिकाणाहून आलेल्या स्पर्धकांचा महाअंतिम सोहळ्यात समावेश असणार आहे.







कृषीवल
www.krushival.in
रायगड
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022)
रविवार, दि. २० फेब्रुवारी २०२२


म ह त्वा चे

## आंबेतमध्ये सेनेला खिंडार

। आंबेत। वार्ताहर।

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विकासकामांवर विश्वास ठेवत आंबेत बोढणवाडी शिवशक्ती मित्र मंडळ येथील असंख्य युवकांनी खा. सुनील तटकरे, आ. अनिकेत तटकरे तसेच पालकमंत्री अदिती तटकरे, बबन मनवे, जयंत चिबडे, महेश शिर्के, रवी तटकरे, विलास जांभळे, यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विकास कामांवर विश्वास ठेवत पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. यामुळे आंबेत परिसरात शिवसेनेला पुन्हा एकदा खिंडार पडला आहे.

# पालीत शासकीय वसतिगृहास मान्यता

। पाली/बेणसे। वार्ताहर।

सुधागड तालुका हा आदिवासी बहुल तालुका आहे. त्यामुळे तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण घेता यावे व त्यांची गैरसोय थांबावी यासाठी पालीत सुसज्ज आदिवासी वसतिगृह उभारण्यात येणार आहे. त्यासाठी तब्बल साडेबारा कोटींची प्रशासकीय मान्यता नुकतीच मिळाली आहे.

गीता पालरेचा यांनी सुधागड तालुका आदिवासी संघटनेला शासनाने दिलेल्या मान्यतेची प्रत दिली. यावेळी हरिश्चंद्र पाटील, सादुराम साजेकर, सुधागड आदिवासी संघटना अध्यक्ष चंद्रकांत वाघमारे, उपाध्यक्ष विश्वास भोय, दशरथ वालेकर, कृष्णा वाघमारे, लक्षण पवार, रमेश पवार, संतोष वाघमारे, बबन वाघमारे, दगडु वाघमारे व रामा हीलम आदी उपस्थित होते. पालकमंत्री तटकरे यांनी सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी शासनाकडे सादर केलेल्या या वसतिगृह इमारतीच्या प्रस्तावाचा सातत्याने व्यक्तिगत पाठपुरावा केला होता.

त्या अनुषंगाने शासनाने पाली येथे आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह उभारण्यासाठी १२ कोटी ५० लक्ष रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.



॥ आदिवासी संघटनेला मान्यतेची प्रत सुपूर्द

### वसतिगृहाच्या कामाची सुरूवात

**या वसतिगृहाच्या कामाची सुरुवात येणाऱ्या आर्थिक वर्षापासून होणार असून. तीन वर्षांत हे काम पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी पहिल्या वर्षासाठी एक कोटी २५ लाख,तर दुसऱ्या वर्षासाठी ५ कोटी २५ लाख; तर त्यापुढील वर्षासाठी ६ कोटी खर्च अपेक्षित आहेत.**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गौळवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमिन मिळकत तिचे मालक अंकुश हरी उर्फ हरीभाऊ बदे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै |
|---|---|---|---|
| १ | ३/अ | ०-३७-८० | १.८६ |

तरी सदर मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, अथवा अंन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास वर वर्णन करण्यात आलेली मिळकत ही निर्वेध, बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**दि. २०/०२/२०२२**
मो. ९८५०८९९२२९

**ॲड.सुवर्णा लक्ष्मीकांत चंदन**
शिव ओम कॉम्प्लेक्स, मुद्रे(बु.)
कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड.

## मांदय शिवा जैतू १०२ व्या वर्षी कालवश

**।अलिबाग। विशेष प्रतिनिधी।**

नवगाव.ता.अलिबाग येथील श्रीमती मांदय शिवा जैतू (वय १०२) यांचे नवगाव येथे (दि.१५ फेब्रुवारी) निधन झाले. मांदय जैतू यांच्या निधनाची बातमी कळताच शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांनी कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. मांदय शिवा जैतू यांच्या पश्चात ३ मुले सुना,मुली नातवंड, पणतू, खापर पणतू असा मोठा परिवार आहे. दशविधी कार्य सोमवारी २१ फेब्रुवारी नवगाव येथील त्यांच्या राहत्या घरी तसेच विधी कार्य नवगावच्या समुद्रकिनारी होणार आहेत.



## पालकमंत्र्यांची द्रोणागिरीला भेट

। तळा । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील द्रोणागिरी पर्वत विकासासाठी राज्य सरकारने पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत १.५० कोटी रुपये मंजूर केले असून, पालकमंत्री अदिती तटकरे यांच्या प्रयत्नातून या विकासकामांना गती मिळणार आहे.

त्या अनुषगांने त्यांनी या भागातील ग्रामस्थांशी चर्चा करुन त्या भौगोलिक परिस्थितीचा आढावा घेतला आणि अधिकारी वर्गाशी या कामाबाबत चर्चा केली.

यावेळी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे द्रोणागिरी येथे स्वागत करण्यात आले.

यावेळी चंद्रकांत रोडे, गणेश वाघमारे, जि. प. सदस्य बबन चाचले, निकिता गायकवाड, शेनवली, गोविंद हिरवे ग्रा. पं. सदस्य, नागेश लोखंडे मंगेश भगत, देविदास रामाणे, मालाठे ग्रामस्थ, मालाठे धनगरवाडी, खांबवली धनगरवाडी आदी ग्रामस्थ मोठ्या संख्ये या कार्यक्रमास उपस्थित होते.



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाच्या मिळकतींचे विद्यमान मालक **१. दिनेश अर्जुन रामनानी २. अर्जुन किसन रामनानी ३. वैशाली विजय ढोलकिया** यांचेकडून कायम खरेदी करणार असून, आमची अशिल व मिळकतीचे मालक यांच्यामध्ये खालील मिळकतीबाबत करारनामा लिहून झालेला आहे. सदर मिळकतीचे खरेदीखत आमचे पक्षकार यांच्या लाभांत करुन देण्याचे विदयमान मालकांनी मान्य व कबूल केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कोशिंबळे, ता.माणगांव, जि.रायगड**

| अक्र. | स.नं./गट नं | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १) | ७०/१अ | ५-१८-०० | २.०० |
| २) | ७०/१ब | २-००-०० | १.०० |
| ३) | ५८/१ब | १-००-०० | २.०० |

वरील मिळकती विदयमान मालक पूर्णपणे निर्वेध व त्यांचे मालकीची तसेच ताबेकब्ज्या वहिवाटीची आहे असे सांगतात तसेच विद्यमान सात बाऱ्या वरुन दिसते. याची खात्री मिळकतींच्या मालकांनी आमच्या अशिलांस दिली असून, मिळकतींचे मालक आमच्या अशिलांचे लाभांत खरेदीखत करुन देणार आहेत. तरी वरील मिळकतींमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षिस, वहिवाट, पोटगी, विक्रीचा करार, दावा, लिज, वाटणी, बोजा, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकत कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत कळवाव्यात. तसेच जर कुणाचा हिस्सा मालकी खरेदीदस्त बक्षिस पत्र व इतर कोणत्याही नोंदणीकृत कागदपत्रांन्वये असल्यास तशी कागदपत्रे पुराव्याकामी हरकती सह सादर करावीत. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत कागदोपत्री पुराव्यानिशी प्राप्त न झाल्यास मिळकती निर्वेध आहे व कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सही/-
ठिकाण : माणगांव
दिनांक : १९/०२/२०२२
**ॲड. माधव तायडे**
मो. ९९८७०८८२२२

## पनवेलमध्ये रंगला ‘रंगछटा २०२२’चा सोहळा

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल येथे दि. १६ फेब्रुवारी रोजी चित्रपटसृष्टीचे जनक स्वर्गीय दादासाहेब फाळके यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था आणि रिफ्लेक्शन थिएटर, पनवेल आयोजित ‘रंगछटा २०२२’ एकपात्री व द्विपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते तथा जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष प्रीतम म्हात्रे यांच्यासह स्पर्धकांचे मनोबल वाढविण्यासाठी व मार्गदर्शन देण्यासाठी मराठी सिनेसृष्टीचे ज्येष्ठ रंगकर्मी, सिनेअभिनेते जयंत सावरकर हेही उपस्थित होते.

प्रथम सत्रात नटराज पूजन व दीपप्रज्वलन याने सुरुवात करून प्रीतम म्हात्रे व जयंत सावरकर यांनी स्पर्धकांना मार्गदर्शन करुन त्यांचा उत्साह वाढवला. या स्पर्धेमध्ये एकूण ४५ स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेचे विनय जोशी व मनोहर लिमये यांनी परीक्षण केले. स्पर्धेमध्ये एकूण १६ बक्षिसे देण्यात आली. बक्षीस वितरण सोहळ्यामध्ये सिनेअभिनेते जयंत भालेकर, सिनेअभिनेते शेखर फडके, सिद्धार्थ साळवी, विजय पवार, स्वराज्य विहार घाग व बाल नाट्य निर्माते गायधनी हेसुद्धा उपस्थित होते.

रंगछटा २०२२ या स्पर्धेचे एकपात्री अभिनय स्पर्धेचे प्रथम पारितोषिक स्वप्नील साळवी, द्वितीय परेश राजश्री, तृतीय स्वप्नील रसाळ, उत्तेजनार्थ ऋतुजा, अजिंक्य टेकाले, शिवदास कुमटे, कल्याणी म्हात्रे, वैष्णवी पाटील व लक्षवेधी एकपात्री सिद्धी पवार यांना देण्यात आले. द्विपात्री अभिनय स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक अक्षता साळवी व रसिका पवार, द्वितीय स्वप्निल बनकर, सिद्धेश शिंदे व तृतीय पारितोषिक यश खाडे, ग्रंथा घाग, उत्तेजनार्थ आंचल जैन, सिद्धेश शिंदे, स्वप्नील बनकर, ग्रंथा घाग, द्विपात्री विनोदी अक्षता साळवी द्विपात्री लक्षवेधी दिया राणे यांना देण्यात आले.

या कार्यक्रमाला शेकाप जिल्हा चिटणीस गणेश कडू, गणेश पाटील, ए. के. शेख, माधुरी गोसावी, डॉ. सुरेखा मोहोकार, प्रीती जॉर्ज, सारिका भगत, डी. पी म्हात्रे, सुजाता ठक्कर, देवेंद्र पाटील, अनिल बंडगर, मंदार दोंदे, श्री. सोनवणे, डी. एन यादव, किरण घरत, संजय कदम, विजय पवार, हरीश मोकल, संदेश मोहन, मंगेश अपराज, योगेश कोठेकर, रोहन गावंड, वैभव जोशी, सिद्धांत साखरे, पंकज वाघ, नाना रणदिवे, वरून महागावकर उपस्थित होते.



ज्येष्ठ अभिनेते जयंत सावरकर यांची विशेष उपस्थिती

## राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे वृक्षारोपण

**। खोपोली। प्रतिनिधी।**

राज्याचे जलसंपदा मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत खोपोलीत पक्षाच्यावतीने वृक्षारोपण करण्यात आले आहे.

खोपोली नगरपालिकेच्या सर रविंद्रनाथ टागोर जलशुद्धीकरण केंद्राच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी माजी नगरसेवक मोहन औसरमल, अतुल पाटील, सुवर्णा मोरे, विशाल गायकवाड, इंद्रसेन घोडके, जयश्री डोंगरे, वैशाली भोसले, प्रज्ञा महाडिक, प्रतीक्षा नाईक, पवार, अश्विनी ढोळे, प्रजाक्ता शिर्के उपस्थित होते.

नगरपालिकेच्या आवारात लावलेल्या झाडांचे कर्मचारी निगा राखतीलच; पण महिला पदाधिकाऱ्यांनी दरमहा याठिकाणी येऊन झाडांचे संगोपन करा, असे आवाहन मोहन औसरमल यांना केले आहे.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कोळगांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.श्रीपाद महादेव कोलवणकर यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कोळगांव | ६५/१ | जिरायत ०-३२-९०<br>वरकस ०-६१-९४<br>पो.ख. ०-०२-८६<br>एकूण ०-९७-७० | ६.२२ |

वर नमुद संपूर्ण मिळकतीपैकी ०-४२-५० हे.आर.क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ति विकणेंचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण,दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून दाव्यात. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण-अलिबाग
**दिनांकः १९/२/२०२२**
सही/-
**ॲड.स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु.बुरूणखाण, पो.वरसोली
मोबा. क्र. ९९२२७०७०१२

## जासईत शिवजयंती उत्साहात साजरी

**। उरण। प्रतिनिधी।**

रयत शिक्षण संस्थेचे श्री.छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेज जासई विद्यालयात महाराष्ट्राचे आराध्यदैवत, श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न झाली. यावेळी सुरेश पाटील,रामभाऊ घरत,नरेश घरत,मधुकर पाटील, अमृत ठाकूर,यशवंत घरत,पद्माकर अरुण जगे, रमेश पाटील, विवेक म्हात्रे, सुभाष घरत,सुनील घरत,गोविंद घरत,सर्व सेवक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते. शिवजयंती निमित्त विद्यालयात पथनाट्य, पोवाडे, विविध वेषभूषा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## शिवजयंतीनिमित्त चित्रकला स्पर्धा

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील करंजा येथील रा. जि. प. प्राथमिक शाळा कोंढरी येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त माजी विद्यार्थी इयत्ता ७ वी यांच्या वतीने प्राध्यापक आणि शाळा कमिटी यांच्या मार्गदर्शनाखाली चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. तसेच शाळा कमिटी व शिक्षकांनी सुद्धा सहभाग दाखवला. उत्तीर्ण स्पर्धकांना प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच उत्तेजनार्थ असे चित्रकलेचे साहित्य व आकर्षक ट्रॉफी बक्षीस म्हणून देण्यात आले.

सध्याची परिस्थिती पाहता अनेक माजी विद्यार्थी संघ वेगवेगळ्या ठिकाणी व पर्यटन स्थळी जाऊन आपले गेट टू गेदर सारखे कार्यक्रम करत असतात. सदर माजी विद्यार्थ्यांनी आगळा वेगळा उपक्रम राबवून एक वेगळा आदर्श सर्वांसमोर ठेवला आहे.आपण ज्या शाळेत शिक्षण घेतले त्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावी या उद्देशाने माजी विद्यार्थी इयत्ता ७ वी वर्ष २०१०-११ यांनी चित्रकला स्पर्धे चे आयोजन केले होते.

याप्रसंगी मच्छिंद्र म्हात्रे यांनी आपल्या संभाषणातून अशाच प्रकारचे वेगवेगळे कार्यक्रम व्हावे असे मत मांडले तसेच माजी विद्यार्थ्यांचे आभार मानले.

## पत्रकारावर हल्ला करणारा अद्याप फरार

**। नेरळ। वार्ताहर।**

कर्जत येथील पत्रकार अजय गायकवाड १५ फेब्रुवारी रोजी मारहाण झाल्यानंतर त्याच दिवशी दुपारी नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. नेरळ पोलिसांनी अजय गायकवाड यांना मारहाण प्रकरणी नेरळ वाल्मिकीनगर येथील जयेश उर्फ मॉन्टी कोंडीराम कदम या तरुणावर गुन्हा दाखल केला आहे. हा तरुण नेरळ गावात फिरत असल्याने कर्जत तालुक्यातील पत्रकारांनी कर्जत येथे असलेल्या उपाधीक्षक कार्यालयात जाऊन पोलीस अधीक्षक विजय लगारे यांची भेट घेतली. तसेच तरुणावर तात्काळ कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की माझे पक्षकारांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत श्री.नाथा रघुनाथ फडके यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बलीवरे ता. कर्जत जि. रायगड**

| सर्व्हे नं.हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू. पै |
|---|---|---|
| ४४/७ | १.८१.००<br>पो.ख. ०.०९.००<br>एकूण १.९०.०० हे.आर.पॉ.<br>यापैकी ०.८०.०० हे.आर.पॉ | १.६९ |

तरी सदर मिळकतीपैकी कोणत्याही व्यक्तीचा अथवा संस्थेचा गहाण दान बक्षीस खरेदी साठेकरार कुळहक्क वहिवाटीचा हक्क ताबा भाडेपट्टा पोटगी मृत्यूपत्र बोजा अथवा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्कसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती आणि त्याच्या हरकती नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या मुदतीत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहेत असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही

**दिनांक : २०/२/२०२२**
**ॲड. निता नरेश बैलमारे**
शॉप नं. १५ सनराईज अपार्टमेंट
कचेरी रोड कर्जत-रायगड.
मो. ९२२६३३१५२६

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

# काँग्रेसच्यावतीने माथेरानमध्ये स्वच्छता मोहिमेस प्रतिसाद



**। माथेरान। वार्ताहर।**

पर्यटनवाढीसाठी स्वच्छता गरजेची असून, त्यामुळेच खऱ्या अर्थाने इथे पर्यटकांची संख्या वाढेल. ही बाब लक्षात घेऊन येथील काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून दि.१७ फेब्रुवारी रोजी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. वाल्मिकी नगर आणि पंचशीलनगर या भागातील कचरा गोळा करण्यासाठी काँग्रेसच्या नेत्यांसह अन्य पक्षाच्या कार्यकर्त्यांनी, विविध मंडळांच्या, समाजाच्या पदाधिकाऱ्यांनीसुद्धा स्वेच्छेने या मोहिमेत पुढाकार घेऊन गटारात उतरून जवळपास पंचवीस गोणी कचरा गोळा केला आहे.

ही मोहीम यशस्वी होण्यासाठी माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, शिवाजी शिंदे, संतोष लखन, शुभम गायकवाड, मुकेश शहा, नितीन शहा, सुनील शिंदे, राकेश कोकळे, अमोल चौगुले, अनिकेत बनसोडे, बिलाल महापुळे, केतन रामाणे, पप्पू खान, शबाब कुरेशी, शफीक शेख, वर्षा शिंदे, सुहासिनी दाभेकर यांसह असंख्य कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## डम्पिंग ग्राऊंडच्या दुर्गंधीमुळे आरोग्य धोक्यात

**। म्हसळा। वार्ताहर।**

म्हसळा शहरात दुर्गवाडी, चिराठी रस्त्यालगत असणाऱ्या कचरा डम्पिंग ग्राऊंडमधून संध्याकाळच्या वेळेस दुर्गंधी पसरत आहे. या दुर्गंधीच्या त्रासामुळे शहरातली नागरिक, लहान मुलांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या दुर्गंधीचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यात यावा, नाहीतर शहरातली नागरिकांच्या न्याय्य हक्कासाठी उपोषणाला बसणार असल्याचे राखी करंबे यांनी तहसीलदार समीर घारे आणी नगरपंचायतच्या अधिकारी दीपल मुंडये यांना निवेदनाद्वारे सांगितले आहे. यावेळी सुरेश कुडेकर, अमित महामुनकर, अक्रम साने, कौस्तुभ करडे, प्रसाद बोर्ले, राजकीरण खताते, दुर्गेश खताते, कल्पेश जैन, अजय करंबे, उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,
आमचे अशिलांनी **मौजे दत्तपाडा, तलाठी सजा सारळ, ता. अलिबाग,** जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक **श्री. जनार्दन सिताराम पाटील, श्री विश्वनाथ सिताराम पाटील** यांच्याकडून विकत घेण्याबाबत निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
मौजे दत्तपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील
तलाठी सजा सारळ यांचे हद्दीतील-

| गट क्रमांक | क्षेत्र हे.आर | आकार रू. पै |
|---|---|---|
| ३३ | ००-६०-२०<br>पो.ख. ००-०३-३०<br>एकूण ००-६३-५० | ७-५७ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे

**अलिबाग**
दिनांक : १९/०२/२०२२
**ॲड. रविंद्र विनायक ओक**
“गुरूकृपा महर्षी कर्वे रोड,
अलिबाग अर्बन बँकेजवळ, अलिबाग


ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५



तुफानातील दिवे
दीपक शेडगे
९९६९४०८८३५

# बांधिलकी जपणारा लोकप्रिय अभिनेता - मकरंद अनासपुरे



एक मध्यमवर्गीय तरुण आपले शिक्षण संपवून नोकरी करण्याकरीता एका कंपनीमध्ये मुलाखतीसाठी गेला. मुलाखती नंतर मॅनेजरने त्याची फाईल बघितली. त्यात ॲकॅडमिक आवश्यक प्रमाणपत्र होतीच पण त्याचबरोबर एस्ट्रा करीक्युलर ॲक्टीव्हीटीजची ७० ते ७५ प्रमाणपत्रे होती. त्यात नॅशनल युथ सर्टीफिकेट, एका नाट्य स्पर्धेचे सुवर्ण म्हणजे गोल्ड मेडलही होते. ती पाहून मुलाखत घेणारा म्हणाला, तू त्या क्षेत्रातच प्रयत्न कर. जर तुला यश मिळाले नाही तर दोन वर्षानी तु मला पुन्हा येवुन भेट. तुझ्या सारखी मुले या टायरच्या फॅक्ट्रीत काय काम करणार? तुला नोकरी दयायला मला काहीही हरकत नाही, पण बघ तुझे करिअर आणि तुझ्यातला कलावंत मला या नोकरीपेक्षाही मोठा वाटतोय. ही घटना आहे मकरंद अनासपुरे यांच्या तरुणपणाच्या काळातील. आमच्या फुलराणी ॲव्हरटाझिंग तर्फे पाण्याचे महत्त्व सांगणाऱ्या जाहिरातीचे चित्रीकरण पनवेल जवळील चिपळे गावात करताना गप्पांच्या ओघात मकरंदने मला सांगितली.

फुलराणी निर्मित एका जाहिरातीच्या चित्रिकरणावेळी मकरंद अनासपुरेसोबत दिग्दर्शक दीपक शेडगे. मकरंद पुढे सांगत होता, तो क्षण मला प्रेरणा देऊन गेला आणि माझ्या आयुष्यालाही कलाटणी देऊन गेला. माझ्यातला कलावंत नोकरीसाठी माझी मुलाखत घेणाऱ्याने अचूक हेरला आणि पुन्हा मला तिथे नोकरी करण्याची गरजच पडली नाही. 'टुरटुरय', 'जाऊबाई जोरातय', या सारखी लोकप्रिय नाटक 'दि एन्डचा शेवट', 'बेधुंद मनाची लहरय', 'टिकलं ते पॉलिटीकल' या सारख्या मालिका 'यशवंत', 'जिस देश मे गंगा रहता है', यासारखे हिंदी चित्रपट आणि 'सातच्या आत घरात', 'सावरखेड एक गाव' यासारखे मराठी चित्रपट करण्याची संधी मला यानंतर मिळाली. 'दि एन्डचा शेवट' या मालिकेचे निवेदन करताना एका वेगळ्या म्हणजे आपल्या बोलीभाषेतील्या शैलीत निवेदन करण्याचा मी जेव्हा प्रयोग केला तेव्हा तो लोकांना खुपच आवडला. आपली एक स्वतंत्र स्टाईल असावी असे मला नेहमी वाटायचे. खरं तर प्रत्येकाची वेगळी स्टाईल असते. तसे माझ्या बाबतीतही झाले. माझी भाषा मराठवाड्याची आहे. पण त्यानंतर पुणे, मुंबई, औरंगाबाद अशा शहरी व ग्रामीण भागातही माझे जाणे झाले व कळत न कळत भाषा बदलली. ती भाषा मिक्स होवून एक मस्त मजेदारपणा त्यात आला, माझी बोलण्याची स्टाईल, माझा अभिनय प्रेक्षकांना आवडतो. प्रेक्षकांची पत्रे येतात त्यामुळे माझा उत्साह वाढतो.

मिळालेल्या पुरस्काराबद्दल विचारल्यावर मकरंद म्हणाला, मला सर्वात पहिला बालगंधर्व पुरस्कार मिळाला. तसेच १९९४ साली मला नाट्यदर्पणचा सर्वोत्कृष्ट अभिनयाचा पुरस्कार सुध्दा मिळाला. ती एक एकांकिका स्पर्धा होती व तिचा विषय ही चांगला होता. प्रा. दासू वैद्य यांनी ती दिग्दर्शीत केली होती आणि मी त्यात महत्वपूर्ण भूमिका केली होती. त्या पुरस्काराने मला त्याकाळात खुप मोठी प्रेरणा व आनंद दिला. त्यानंतर आतापर्यंत मला अनेक पुरस्कार मिळाले पण सुरुवातीच्या काळातले हे काही पुरस्कार मला अधिक महत्वाचे वाटतात.

या क्षेत्रात तुमची सुरुवात कशी झाली? असे विचारल्यावर मकरंद लहानपणातील आपल्या आठवणीनी मोहरुनच निघाला. तो सांगू लागला मला सुरवातीपासून अभिनयाची आवड होती. बालपणापासून मी शाळेत काम करायचो. मी खेडेगावात असल्यामुळे मला वाव नव्हता. मग मी बीडला आल्यानंतर खरी सुरुवात झाली. बालनाट्य, एकांकिका केल्या. माझे मार्गदर्शक मित्र आणि स्नेही प्रा. सतिश साळुंके यांनी मला मोलाची मदत केली. मी 'चेटकिणीची फजिती' हे बालनाट्य केले. रंगरंगीले, छैलछबिले सारखी नाटके स्पर्धेसाठी केली. स्पर्धेसाठी नाटक करायला आम्हा मित्रांना फार हुरुप यायचा. त्यानंतरच्या काळात कॉलेजमध्ये असताना खरी कारकीर्द सुरु झाली होती. रंगभूमीवर जवळ जवळ ६०० च्या आसपास एकांकिका व नाटके केली. ग्रॅज्युएशन दरम्यान सरस्वतीभुवन महाविद्यालयातही सर्वोत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक मिळाले. त्या काळात पथनाटयही खूप केली. तेव्हाचा एक प्रसंग माझ्या स्मरणात आहे. सगळे शासकीय विषय असायचे. हुंडाबळी, साक्षरता प्रसार, पाणीप्रश्न, अपघात, सुरक्षा अशा सामाजिक प्रश्नांवर पथनाट्य बसवायचो. साक्षरता अभियान व हुंडा विरोधी पथनाट्यांना त्यावेळी चांगला प्रतिसाद मिळायचा. माझे एक मित्र दिलीप शिंदे उपजिल्हाधिकारी होते. ते एके दिवशी सकाळी आले व मला म्हणाले, मला एक पथनाट्य करायचे आहे. गंमत अशी होती कि त्याचे स्क्रीप्ट नाही, तयारी नाही, आणि वेळही अतिशय कमी. आम्हाला प्रवासात चार पाच तास वेळ मिळाला. आम्ही ठरवले एकाने काही विचारले की दुसऱ्याने त्याला उत्तर द्यायचे आणि नाटक पुढे न्यायचे आणि माझ्या सर्व ग्रुपने अतिशय सुंदर परफॉमन्स दिला. माझा त्यात मोठा रोल होता. पथनाट्य दोन तास चालले. ते खूप रंगले. खूप मजा आली. शासनाच्या शिक्षण विभागाच्या कुमुद बंसल मॅडमनी आमच्या अभिनयाच खूप कौतुक केले, एवढंच नाही तर म्हणाल्या तू ॲक्टींगशिवाय दुसरे काहीच करु नकोस. खरं तर माझ्या दृष्टीने ती एक कौतुकाची थाप होती. त्यांनी माझा मोठा सत्कार सुध्दा केला माझ्या घरातील लोकांनाही त्यावेळी फार आनंद झाला.

मकरंद आपल्या लहानपणीच्या व उमेदीच्या काळातील आठवणी सांगताना अधूनमधून अंतर्मुख होताना दिसत होता. परंतु सगळ्या आठवणी तेव्हढ्याच ताजेपणाने सांगत होता. माझे बालपणीचे शिक्षण माजलगांवला झाले. जे बीडपासून खूप इंटेरियरला आहे. त्यानंतर मी पदवीसाठी औरंगाबादला आलो. तिथे मी माझे शिक्षण बीएससी फर्स्ट क्लासने पूर्ण केले, नंतर ड्रॅमॅटिक्स डीग्रीसाठी प्रवेश घेतला व तेथे सुध्दा मी फर्स्ट क्लासने पास झालो. अभ्यासाबरोबर अभिनयातही प्रगती करावी असे मला वाटत होते. या दरम्यान एकांकिकेचं काम सुरु होते. त्या निमित्ताने माझे मुंबईला येणे जाणे होते आणि १९९४ मध्ये मी मुंबईत स्थायिक झालो. नाटक, पथनाट्य, हिंदी चित्रपट, मराठी चित्रपट, मालिका, जाहिरातीसाठी एकापाठोपाठ काम मिळाले. वेगवेगळ्या भूमिका करु शकलो. केदार शिंदेमुळे मला पहिली संधी मिळाली. 'झाले एकदाचे' या निमित्ताने अशोक सराफ, सुधीर जोशी या नामवंत कलाकारांबरोबर काम करण्याची संधी मिळाली. त्यात माझा रोल छोटा होता पण समिक्षकांनी त्याची चांगली नोंद घेतली. केदारटे टूरटूर नाटक केले. त्यातील भूमिकेला सुध्दा मला चांगला प्रतिसाद मिळाला. माझी एक ईमेज तयार झाली. 'जाऊ बाई जोरात' चे १००० प्रयोग केले. महाराष्ट्र शासनाच्या नाट्य स्पर्धामध्ये त्याची तारिफ झाली. त्याला मराठी प्रेक्षकांनी चांगला न्याय दिला व त्याला दोन बक्षिसेही मिळाली. जबाबदारीने काम केले की, अडचण येत नाही. रोल छोटा असला तरी आपले अस्तित्व आपल्याला सिध्द करता आले पाहिजे. माझी मी एक स्टाईल निर्माण करण्याचा प्रयत्न केला. माझ्या दृष्टीने स्वत:ची प्रतिमा असणे आवश्यक आहे. मग काम मिळणे कठीण जात नाही. आपले काम आपण जबाबदारीने केले पाहिजे हे माझे मत आहे. 'सुनं सुनं आभाळ', 'दि एन्डचा शेवट', 'बेधुंद मनाची लहर', 'टिकल ते पॉलिटीकल', 'सोनपावली', 'मावशी नंबर वन' इत्यादी मालिका केल्या. त्यातही 'टिकल ते पॉलिटीकल' मधील पेंद्याची भुमिका प्रेक्षकांना फार आवडली. प्रेक्षक मला आपली पसंती देतो हीच माझ्या अभिनयाला मिळालेली पोच पावती. मला मराठी सिनेमात काम करण्याची संधीही लवकरच मिळाली. श्रावणी देवधर यांनी तो दिग्दर्शित केलेल्या 'सरकारनामा' मध्ये नाथाचा छोटासा रोल मी केला आणि



मग त्या भर पडत गेली. शिवाजी साटम, महेश मांजरेकर यांनी मला मोलाचे मार्गदर्शन केले, मदत केली आणि मग मनवसाचे पोरय, 'सावरखेड एक गाव', 'सातच्या आत घरात', 'कवडसे', 'काळूबाईच्या नावानं चांगभलं', 'राजा पंढरीचा' असे अनेक सिनेमे मिळाले. त्यातील भूमिका माझ्या नाट्यसिनेमा प्रवासात महत्वाच्या ठरल्या.

हिंदी सिनेमात नाना पाटेकरने मला फार मदत केली. एका पुरस्कार सोहळ्यात बक्षीस देतांना म्हणाले तुझ्यासारख्या ॲक्टरची गरज आहे पुढे मी मुंबईला आलो आणि त्यांनी मला संधी दिली यशवंतय मध्ये मी काम केलं. नंतर एन. चंद्रानी 'वजूद' मध्ये ही रोल दिला. 'निदान', 'वास्तव', 'प्राण जाए पर वचन न जाए', 'जिस देश में गंगा रहता है' अशा हिंदी चित्रपटात मला संधी मिळाली. रोल छोटा जरी असला तरी मी तो मेहतीने कलात्मकरीत्या करतो. रोल आपण कसा करतो ते महत्वाचे असते. हिंदी चित्रपटात रोल छोटा असला तरी तो जगभर जातो, त्यामुळे प्रेक्षक वाढतो. मराठी बरोबरच मला हिंदीमध्ये देखील काम करायला आवडते. स्मिता तळवलकर, मंगेश कुलकर्णी, पुरुषोत्तम बेर्डे यांनी मदत केली तशी हिंदीत देखील वेळोवेळी अनेकांनी मला चांगली मदत केली. सिनेमा, मालिका, नाटक यांच बरोबर बऱ्याच जाहिरातीचे काम मिळाते. त्यातला अँकर वायरच्या जाहिरातीला तर रापाचे बेस्ट अवॉर्ड सुध्दा मिळाले आहे. ॲडमध्ये देखील मान व समाधान मिळाले. सॅमसन, ॲमरॉन बॅटरीज, होंडा जेनेक्स या सारख्या हिंदीतल्या जाहिराती मी केल्या तर मराठीतील भटकंती, शतायुषी दिवाळी अंक आणि रामबंधू मसाले, जाहिरातीमध्ये चांगले काम मिळाले.

नाना पाटेकर,कमल हसन, अमिताभ बच्चन, ओम पुरी, रघुवीर यादव हे मला सर्वात जास्त आवडतात तर पाश्चात्यांपैकी चार्ली चाप्लीन, जॅकी चॅन, जेरी लुईस हे सुध्दा मला आवडतात.

अभिनय क्षेत्रात आल्यामुळे सर्वात महत्त्वाचे म्हणजे चांगली माणसे मला भेटली. स्मिता तळवलकर, हर्षदा खानविलकर यांनी मला चांगले सहकार्य केले. महेश मांजरेकर, मंगेश कुलकर्णी, केदार शिंदे यांनी मला प्रत्येक वेळी चांगले मार्गदर्शन केले. त्यामुळे माझी भूमिका अधिक चांगली व्हायला मदत झाली. अशी माणसे भेटणे, त्यांच्या बरोबर काम करुन पुढे जाणे यात मला मोठा फायदा वाटतो.

सर्वांनी मला प्रेम दिले, मोठे केले त्या समाजातील माणसांसाठी सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून काहीतरी केले पाहिजे असे वाटल्यामुळे गरजू लोकांना आणि शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी नाना पाटेकरांसोबत नाम फाऊंडेशनची स्थापना केली. मकरंदमधील कलावंत घडताना लहानपणापासूनच त्याच्यातील सामाजिक बांधिलकीची जाणीवही तेवढ्याच संवेदनशीलपणे वाढत होती हे मकरंदशी गप्पा मारताना मला जाणवत होतं.

deepakshedge007@gmail.com

# साप्ताहिक राशिभविष्य : दि. २० ते २६ फेब्रुवारी २०२२

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## इच्छा फलद्रुप होतील

**मेष :** मेषराशीधारकांनी आपले ग्रहमान पाहता ह्या नवीन वर्षात दूरवर किंवा परदेशात जाऊन शिक्षण घेण्याची आपली इच्छा फलद्रुप होऊ शकेल. नंतर आपणास गूढ विषयांची गोडी लागेल. आपल्या माणसाकडून होणाऱ्या प्राप्तीत सप्ताहाच्यामध्यापासून कपात होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांचा अभ्यास चांगला होईल. आपणास अभ्यासाची गोडी कमी असून सुद्धा किंवा काही अनिश्चितता आली तरी आपण प्रगती साधू शकाल. असे असले तरी पुढील आठवड्यापासून ते अखेर पर्यंत अधिक परिश्रम करावे लागतील. मित्र वर्तुळात अधिक वेळ वाया दवडू नये अन्यथा त्यांच्यामुळे आपल्या अभ्यासावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. उच्च शिक्षणासाठी परदेशात जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना शेवटच्या दिवसांत यशप्राप्ती होईल. परदेशी जाण्यात काही अडचणी येत असल्यास त्या दूर होतील. आध्यात्मिक साधना व व्यायामातील नियमितता आपल्यासाठी योग्य ठरेल. **महिलावर्ग :** आपली माहेरची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल, कामात असताना तब्बेतिकडे दुर्लक्ष करू नका, नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा, **शुभ दिनांक :** २१,२५ .

## मित्रांचा सहवास लाभेल

**वृषभ :** वृषभराशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता नवीन वर्षात होणारे काही खर्च वगळल्यास बहुतांश वेळी पैसे शिल्लक पडू शकतील. वर्षाच्या सुरवातीस प्राप्तीत वाढ होण्यासाठी केलेले प्रयत्न आता फलद्रुप होतील. घरघूती संबंधात गोडवा राहील. मात्र जिवलग मित्रांचा सहवास घडण्याची शक्यता धूसरच राहील. कदाचित मित्रांचे सहकार्य न लाभल्याने त्यांच्याप्रती आपल्या मनात नाराजीचे सूर उमटतील, मात्र तसे करण्यात त्यांचा काही दोष नसून परिस्थितीच तशी असेल हे ध्यानात ठेवावे. नंतर ह्या स्थितीत सुधारणा होण्याची शक्यता आहे. साप्ताहाच्या अखेर पर्यंत प्रियव्यक्ती संबंधित काही चिंता निर्माण झाली तरी उर्वरित काळ अनुकूल असल्याने प्रियव्यक्ती किंवा वैवाहिक जोडीदाराशी आपण जवळीक साधू शकाल. विद्यार्थी उत्तम प्रगती करू शकणार असले तरी त्याना वाईट संगत सोडण्याचा सल्ला देण्यात येत आहे. **महिलावर्ग :** प्रणयी जीवनात व दांपत्य जीवनात चांगल्या सानिध्याची जाणीव होईल. एकंदरीत ह्या वर्षी आपले आरोग्य चांगले राहिले तरी प्रवासात, साहस करण्या योग्य स्थळी प्रवास करताना दुखापत होण्याची शक्यता असल्याने काळजी घ्यावी लागेल.**शुभ दिनांक :** २३,२४

## कष्ट बहरुन येतील

**मिथुन :** मिथुनराशीसाठी आपले ग्रहमान पाहता ह्या नविन वर्षात आपले कष्ट बहरून येतील. कारकीर्द, अभ्यास, आर्थिक उन्नती, संबंध, सामाजिक अशा कोणत्याही क्षेत्रात आजवर प्रगती साधण्यासाठी किंवा स्वतःची नवीन ओळख बनविण्यासाठी जे काही प्रयत्न आपण केले असतील त्याचे फळ आता मिळू शकेल. सुरवातीच्या दिवसात प्रवासात त्रास होण्याची शक्यता असल्याने शक्यतो तो टाळण्याचा प्रयत्न करावा. मध्यानंतर स्थितीत सुधारणा होऊ लागेल. संपूर्ण वर्षभरात प्रवासाच्या आयोजनात शेवटच्या क्षणापर्यंत अनिश्चितता राहण्याची शक्यता अधिक आहे. सप्ताहाच्या सुरवातीस पैतृक संपत्ती संबंधित कामात यशस्वी होऊ शकाल. ह्या व्यतिरिक्त वडीलांकडून काही लाभ होण्याची अपेक्षा बाळगू शकाल. आर्थिक आघाडीवर काळजी करण्यासारखे काही नाही. बहुदा प्राप्तीत वाढ होण्यासाठी आपण योग्य नियोजन करून भरघोस फायदा मिळवू शकाल. **महिलावर्ग :** पुढील कालावधीत आपल्या प्राप्तीतील अनिश्चितता वाढेल. अखेरीस पैश्यांच्या अभावी आपला खोळंबा होऊ नये म्हणून आगाऊ नियोजन करणे गरजेचे ठरेल. **शुभ दिनांक** : २०,२६.

## आर्थिक प्रगती होईल

**कर्क :** कर्कराशीधारकास या सप्ताहात पाहता हे नवीन वर्ष आपल्यासाठी खूपच आशास्पद आहे. आर्थिक प्रगतीची शक्यता असली तरी कौटुंबिक संबंधांची काळजी घ्यावी लागेल. कोणत्याही बाबतीत कुटुंबियांशी चर्चा करताना आपल्या शब्दात स्पष्टता असण्याची गरज आहे. ह्या व्यतिरिक्त प्रत्येकवेळी आपलेच म्हणणे खरे असल्याचा हट्ट धरू नये. मागील काही दिवसांपासून कौटुंबिक कार्यात विलंब होत असल्यास नंतर त्यास गती प्राप्त होईल. ह्या दरम्यान प्रेम संबंध टिकविण्यासाठी सुद्धा आपणास अधिक प्रयत्न करावे लागतील. विशेषतः या सप्ताहात मध्या पासून संबंध संथ गतीने वाटचाल करत असल्याचे आपणास जाणवेल. विवाहितांना मात्र काहीसे बरे वाटेल. ज्यांना नवीन प्रेम संबंधांची सुरवात करावयाची आहे त्यांना प्रेमाचा प्रस्ताव मांडण्यात काही अडचणी येऊ शकतात. कार्यस्थळी स्पर्धेस सामोरे जाण्याची तयारी ठेवावी लागेल. **महिलावर्ग :** कुटुंबियांशी चर्चेतून किंवा वागणुकीतून गैरसमज उदभवणार नाहीत ह्याची काळजी घ्यावी लागेल. आर्थिक आघाडीवर विशेष त्रास होणार नसला तरी वर्षभर कुटुंबियांसाठी केलेल्या खर्चात आपणास फायदा मिळण्याची आशा आपण बाळगू नये. **शुभ दिनांक :** २१,२३.

## कामाची प्रशंसा होईल

**सिंह :** सिंहराशीसाठी हा सप्ताहात पाहता नवीन वर्षात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. त्यासाठी हा आठवड्यांचा पूर्वार्ध अनुकूल आहे. ह्या व्यतिरिक्त संपूर्ण आठवड्याचे दिवस सुद्धा अनुकूल आहेत. तरीही वागणुकीच्या बाबतीत शक्यतो आपली प्रतिष्ठा मलीन होणार नाही अशी वागणूक ठेवा किंवा एखाद्या कायदेशीर कार्यवाहीस आपणास सामोरे जावे लागणार नाही ह्याची काळजी घ्यावी. नवीन विचारसरणीने आपण कामात मार्गक्रमण कराल. सुरवातीस विद्यार्थ्यांना अधिक मेहनतीसाठी तयार राहावे लागेल. मागील काही दिवसांपासून आपला अभ्यास संथ गतीने होत असेल जो नंतरपासून योग्य गती साधू शकेल. असे असले तरी आपला मार्ग सोपा नसेल. मेहनत हवी त्यात कमी पडू नका. नंतर आपल्या स्थितीत सुधारणा होऊ लागेल. **महिलावर्ग :** प्रकृतीस्वास्थ्य जपा. अखेरीस आरोग्य विषयक काही त्रास होण्याची शक्यता आहे, जुने विकार बळावण्याची शक्यता अधिक आहे. कामाच्या ताणामुळे अनेकदा आपणास थकवा येऊ शकतो. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. **शुभदिनांक :** २२,२४..

## नवनवीन गोष्टी शिकाल

**कन्या :** कन्याराशीसाठी सुरवातीला हे नवीन वर्ष आपल्यासाठी उत्साह घेऊन आले आहे. मागील काही दिवसांपासून आपसात संबंधातील नीरसता व अनिश्चिततेचा सामना आपण करत असलात तर आता काळजी करणे सोडा, कारण जानेवारी अखेर पासून बहुतांश बाबतीत आपण सुनिश्चित होऊ शकाल. ह्या आठवड्यात आपल्या कामातून आपण बऱ्याच नवीन गोष्टी शिकू शकाल. जीवनशैली उंचावण्यासाठी सुद्धा खर्च होण्याची शक्यता आहे. व्यावहारिक संबंधातील अनिश्चिततेमुळे वर्तमान संबंध तोडून नवे संबंध जोडण्यावर आपण अधिक भर द्याल. मात्र ह्या बाबतीत निर्णय घेताना व्यावहारिक दृष्टिकोन ठेवावा अन्यथा आपल्यावर पश्चाताप करण्याची पाळी येईल. जोडीदाराची निवड करताना सुद्धा घाई करू नये अन्यथा वैचारिक मतभेदामुळे संबंधात कटुता निर्माण होण्याची शक्यता आहे. विवाहा विषयी कोणताही निर्णय घेण्यास नंतरच अनुकूलता लाभेल. **महिलावर्ग :** अखेरच्या तीन दिवसांत कौटुंबिक संबंधात काळजी घ्यावी लागेल. व्यावसायिक कारणांसाठी मालमत्ता खरेदी करू शकाल. जर आपण व्यवसाय वृद्धीसाठी मालमत्ता, मशिनरी इत्यादी खरेदी करण्याचा विचार करत असाल. **शुभदिनांक :** २०,२५.

## अनावश्यक खर्च टाळा

**तूळ** : तुलराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता नवीन वर्षात आपल्या संततीला प्रथित यश मिळेल विद्यार्थ्यांसाठी हे वर्ष बरेच यश देणारे असेल आणि स्पर्धा परीक्षेत ही यश मिळाल्याने तुमचे मनोबल वाढलेले असेल. खर्चाचे प्रमाण वाढणार आहे, तेव्हा प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळण्याचा प्रयत्न करा. काही समस्या आल्यास आपल्या बुद्धिचातुर्याचा उपयोग करून त्या सोडविण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. हितशत्रूंचा ससेमिरा जाणवणार नाही. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. व्यवहारात सावधानता बाळगा. लांबचे प्रवास टाळा. आपण सर्वांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. जवळच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. या सप्ताहात आपणास कलाक्षेत्राच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळू शकेल. मात्र अहंकारापासून दूर राहा. **महिलावर्ग :** अनावश्यक गोष्टींची चर्चा करण्यापेक्षा स्वतःच्या कामात अधिक लक्ष दिल्यास ते हितकारक ठरू शकेल. वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवावे म्हणजे गैरसमज होणार नाहीत. आपण आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल. **शुभदिनांक :** २३,२४ .

## प्रलोभनांना भुलू नका

**वृश्चिक :**-वृश्चिकराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता नवीन वर्षात सर्वांशी प्रेमाने वागल्यास आपल्याला मदतीचा हात येऊ शकेल. सरकारी नियम व कायदा यांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्या. आपल्या मुलांसाठी हा काळ बराच अनुकूल राहील यश मिळेल, उत्तरार्धात सार्वजनिक जीवनात आपली सक्रियता वाढेल. ह्या व्यतिरिक्त प्रणयी जीवनाचा नवीन अध्याय सुरु करू शकाल. नियमित व्यायाम व योगाचा अवलंब करावा. दम लागे पर्यंत काम करू नका. ज्येष्ठांचा आदर राखा. नको त्या प्रलोभनांना भुलू नका, सरळ मार्ग अवलंबा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. धार्मिक गोष्टींना प्राधान्य द्याल. मिळणारे समाधान हीच खऱ्या आनंदाची खूण आहे. याबाबतीतला विचार करून वागण्याचा प्रयत्न केल्यास हा आठवडा खऱ्या अर्थाने उत्तम घालवू शकाल. **महिलावर्ग :** कौटुंबिक व कार्यालयीन कामे चातुर्याने पुरी करण्याचा प्रयत्न करा. कामाचा उत्साह वाढेल मात्र कटू बोलण्याचे प्रसंग कटाक्षाने टाळा. आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. **शुभदिनांक :** २३,२५,

## बोलण्यावर नियंत्रण ठेवा

**धनु :** धनुराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता नवीन वर्षात धन आवक सातत्याने वाढत राहील ज्यामुळे तुम्ही बरेच प्रसन्न राहाल. प्रकृतीची काळजी घ्या, आपण आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवून वागल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य होईल. आपल्या बोलण्याने इतरांचा 'इगो' दुखावणार नाही याची दक्षता घ्या. भविष्याचा विचार न करता वर्तमानकाळाचा आनंद घेऊन सुखी-समाधानी राहण्याचा प्रयत्न करा. जागरण टाळा सरकारी नियम व कायद्याचे पालन कटाक्षाने पाळा. चुकीच्या पैशाचा मोह करू नका सरकारी देणी त्वरित भरा. भक्तिमार्गाचा अवलंब केल्यास आनंद मिळू शकेल. आपण सामंजस ठेवल्यास ही वेळ आपल्यासाठी संधि देणारी असेल, आपल्या ओळखीचा फायदा कसा करायचा हे ठरवा बाकी सर्व सोप होईल, **महिलांना :** आपण मेहनतीच्या पर्वातून प्रवास करीत आहात हे विसरू नका व प्रत्येक बाबतीत सावधानता बाळगल्यास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा, जेणेकरून आपल्याबद्दल गैरसमज व नाराजी होणार नाही. आपली कुवत पाहूनच जबाबदारी स्वीकारा. **शुभदिनांक :** २१,२६ .

## नवीन कामे काळजीपूर्वक करा

**मकर :** मकरराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता वर्षाची सुरवात करिअरसाठी सामान्य रूपात शुभ राहील. तुम्ही कुठल्या मोठ्या व्यावसायिका सोबत राहून काम ही करू शकाल. या राशीतील विद्यार्थ्यांना या वर्षी काही मोठी संधी प्राप्त होऊ शकते. तुमच्यासाठी हे वर्ष बरेच उत्तम सिद्ध होईल कारण तुमचे अधिक प्रयत्न यश अर्जित करतील. आर्थिक दृष्टिकोनातून ही वर्ष बरेच अनुकूल आहे आणि ह्या आठवड्यात आयात-निर्यातीशी संबंधित व्यापाऱ्यांना लाभ व यश प्राप्ती होईल. नवीन कामाची सुरवात काळजीपूर्वक करावी. अधीरता व आक्रमक वृत्ती किंवा अंधानुकरण आपल्या मनास सतत नकारात्मकतेकडे खेचून घेईल. मनसिक स्थिति अस्थिर होण्याची शक्यता आहे त्यामुळे प्रार्थना आपल्याला साथ देऊ शकेल विचारपूर्वक केलेली कृती फायदा देणारी असेल. कामानिमित्त प्रवास योग संभवतात. कोणालाही राग येणार नाही अशा दृष्टीने वागणे हितकारक राहील **महिलावर्ग :** उपवास करताना फळ आहार घेणे आपल्याला फायद्याचे आहे. किमती वस्तूची खरेदी करू शकाल घरात महत्वाची वस्तु येईल. कौटुंबिक वातावरण वादासारख्या प्रसंगांनी बिघडणार नाही याची दक्षता घ्या. **शुभ दिनांक:** २०,२३ .

## कोणत्याही क्षेत्रात यश मिळेल

**कुंभ :** कुंभराशी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता नवीन वर्षात तुम्ही वाहन खरेदी करू शकाल. दुसरीकडे वर्षाची सुरवात काहीशी चांगली राहील आणि लग्न झालेल्या कुटुंबात नवीन सदस्याचे आगमन होऊ शकते. शिक्षणात तसेच काही क्रिएटिव्ह क्षेत्रात आपल वर्चस्व निर्माण होईल. कौटुंबिक जीवनात नजर टाकली असता कुटुंबातील लोक अध्यात्मिक गोष्टीत अधिक लक्ष देतील. तथापि इतर काही लोकांसोबत विरोधाभासाची स्थिती बनलेली राहील. धन संबंधित वाद कुटुंबातील शांती भंग करू शकतो. विद्यार्थ्यांसाठी नवीन वर्ष सामान्य राहील प्रोफेशनल कोर्सची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मात्र उत्तम यश मिळेल. ते उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात बरेच चांगले प्रदर्शन करण्यात यशस्वी राहतील. वित्तीय निर्णय घेण्याआधी बरेच विचार करावे लागतील. वर्षाची सुरवात करिअरसाठी काहीशी आव्हानात्मक राहू शकते, सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. **महिलांना :** महिलांना घरबसल्या धनलाभ देणारा कालावधी आहे, हा काळ उत्तम असून कोणत्याही क्षेत्रात यश मिळेल, मोसमी आजारांपासून सावध राहा. **शुभ दिनांक-** २५,२६

## समझोता करावा लागेल

**मीन :** मीनराशीसाठी या सप्ताहात नवीन वर्षांचे ग्रहमान पाहता शांत राहून परिस्थितीचा आढावा घ्यावा. आप्तेष्टांशी संपर्कात राहा व कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. कुटुंबातील ताळमेळ एकमेकांच्या मदतीने पुढे जाईल जर तुम्हाला कुटुंब जोडून ठेवायचे असेल तर, तुम्हाला काही ठिकाणी समझोता करावा लागेल. तुमचे आर्थिक जीवन बदलण्याची शक्यता असेल, विद्यार्थ्यांसाठी आता अनुकूल दिवसांची सुरवात झाली आहे. विद्यार्थ्यांना चांगल्या गुणांची प्राप्ती होईल. अभ्यासात त्यांचे लक्ष लागून अभ्यास चांगला होऊ शकेल, राजकारणापासून दूर राहणे चांगले. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. करिअरच्या दृष्टिकोनातून तुम्हाला पद प्राप्ती होऊ शकते. आपल्या मुलांसाठी हा काळ बराच अनुकूल राहील यश मिळेल, उत्तरार्धात सार्वजनिक जीवनात आपली सक्रियता वाढेल **महिलांना** : मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. तुमच्या परिवाराला सामाजिक रूपात सन्मान आणि संपन्नता प्राप्त होईल. **शुभ दिनांक**-२३,२४.



चिंतन
प्रसाद केरकर
९८६७७२१११०

जनतेनेही आता आपली जबाबदारी ओळखून वागले पाहिजे. मास्क वापरणे, अनावश्यक गर्दीची ठिकाणे टाळणे, हे जनतेच्या हाती आहे. त्याची कडक अंमलबजावणी करणे हे जनतेच्याच हाती आहे. कोरोना अजून किती वर्षे चालेल, हे आता काही सांगता येत नाही, त्यामुळे जे आपल्या हाती आहे, त्यानुसार कोरोना पसरु नये यासाठीची कडक अंमलबजावणी केली पाहिजे. २०२२ साली कोरोना संपेल असा अनेकांचा अंदाज होता; परंतु कोरोना अजून काही काळ सुरु राहील, असा अंदाज आहे. एवढ्या प्रदीर्घ काळ आपण अर्थकारण ठप्प ठेवू शकत नाही. त्यामुळे काम करता-करता कोरोनाशी लढा दिला पाहिजे.


# कोरोना उतरणीला

कोरोनावर आता आपल्या देशात पूर्णपणे नियंत्रण आल्याचे व आता ही साथ उतरणीला लागल्याचे चित्र दिसू लागले आहे. पाच राज्यांतील निवडणुकांचा प्रचार भरात आला असताना कोरोनाचा आलेख उतरणीला लागणे, हे समाधानाकरक म्हटले पाहिजे. कोरोनाची तिसरी लाट फराशी धोकायदायक नसेल असे अनेक वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांना वाटत होते. परंतु, दुसरी लाट एवढी भयानक होती, की लोकांना त्यामुळे मनात एक प्रकारची भीती बसली होती. परंतु, आता कोरोनावर नियंत्रण मिळविण्यात यश आले आहे, असे सध्यातरी दिसत आहे. असे असले तरी सर्व जनजीवन पुन्हा सुरु करीत असताना खबरदारी ही घ्यावीच लागणार आहे. एकप्रकारे आपले आता नवीन जीवन कोरोनापश्चात सुरु झाले आहे. कोरोनाच्या काळात अनेकांना फार कठीण परिस्थितीचा सामना करावा लागला. प्रामुख्याने रोजंदारीवरील मजुरांना जगणे कठीण झाले होते. सरकारने या घटकाला वाऱ्यावरच सोडले होते. अनेक मध्यमवर्गीयांच्या नोकऱ्या गेल्या, तर काही जणांचे पगार कापण्यात आले. आजही त्यांचे पगार काही पूर्वपदावर आलेले नाहीत. अशा स्थितीत अनेकांना आपल्या आयुष्याची नव्याने सुरुवात करावी लागली आहे.

नवीन वर्षाच्या प्रारंभी, म्हणजे जानेवारी २२ रोजी जगातील प्रमुख शहरात कोरोनाच्या ओमायक्रॉनने थैमान घालण्यास सुरुवात केली होती. अर्थातच भारत त्याला काही अपवाद नव्हता. मुंबई, दिल्लीसह देशातील अनेक महानगरांत कोरोनाने पुन्हा एकदा जबरदस्त उसळी अनपेक्षितरित्या घेतली. २०२२ साली तरी कोरोनाच्या सावटाखालून मुक्त होऊ, अशी आशा व्यक्त होत असताना अचानकपणे कोरोनाचा नवीन व्हेरिएंट सक्रिय झाला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, याचा फैलाव यापूर्वीच्या डेल्टा व्हेरिएंटपेक्षा पाच-दहा पटीने जास्त होत होता. मात्र, त्यात एक समाधानाची बाब म्हणजे, याची बाधा अतिशय सौम्य होत होती. त्यामुळे त्याचा प्रसार जेवढ्या झपाट्याने होत आहे, तेवढ्याच वेगाने रुग्ण बरेही होत होते. त्यामुळे अनेकांच्या शरीरात प्रतिकारशक्ती निर्माण होण्यास मदत झाली. असे असले तरी ज्येष्ठ नागरिक व विविध व्याधींनी त्रस्त असलेल्या लोकांसाठी विशेष खबरदारी घेणे गरजेचे ठरले होते. सर्दी, खोकला, ताप याचे रुग्ण आढळत होते. तसेच यातील प्रत्येकाची चाचणी केल्यास अंदाजे ७० टक्के लोकांना कोरोना आढळेल, अशी परिस्थिती होती. असे असले तरीही फारच कमी लोकांना रुग्णालयात दाखल करण्याची आवश्यकता भासली. तिसऱ्या लाटेचा मुकाबला करण्यासाठी मुंबई, पुण्यासह अनेक महानगरांत आरोग्य व्यवस्था सज्ज करण्यात आली होती; परंतु त्याचा फारसा उपयोग झालाच नाही. सरकारने उभारलेल्या जंबो कोव्हिड रुग्णालयाचा कारभार आता गुंडाळावा लागत आहे. बहुतांशी रुग्ण घरीच क्वॉरंटाईन होऊन बरे होत आहेत किंवा बरेच जणांना कोरोना होऊन गेल्याची लक्षणेही दिसत नाहीत. त्यामुळे मुंबईत कोरोनासाठी असलेल्या खाटांपैकी २० टक्के खाटांवर रुग्णांनी भरल्या व अन्य खाटा रिकाम्याच राहिल्या. सरकारने गर्दीच्या ठिकाणांवर बंदी घालण्याचे काम केले. कोरोनाच्या काळात अनावश्यक ठिकाणी, कामाशिवाय गर्दी करण्याचे दिवस नाहीत, हे लक्षात ठेवले पाहिजे. मात्र, मुंबईचा लोकल प्रवास हा गर्दीचा आहे, तेथील गर्दी टाळता येणार नाही. सरकारचा लॉकडाऊनचा विचार दिसत नव्हता. लॉकडाऊनने फार काही साध्य होत नाही, उलट नुकसानच जास्त होते, हे यापूर्वीच्या लॉकडाऊनने उमगले होते. त्यामुळे सर्वच अर्थकारण ठप्प होते व ज्यांचे हातावर पोट आहे, त्यांना उपाशी मरण्याशिवाय काहीच पर्याय राहात नाही.

आपल्याकडे अशी लोकसंख्याही फार मोठी आहे. त्यामुळे आता कुठल्याही परिस्थितीत लॉकडाऊन कोणालाच नको होते. सरकारला व जनतेलाही नको होते. मात्र, रुग्णसंख्या वाढल्यास लॉकडाऊनशिवाय काही पर्याय राहात नव्हता. मात्र, तशी वेळ तिसऱ्या लाटेत काही आली नाही. आपल्याकडे पहिल्या व दुसऱ्या लाटेत लॉकडाऊनचे अनेक वाईट परिणाम जनतेला भोगावे लागले. अमेरिका, युरोपातील देशांनी लॉकडाऊन आपल्यासारखे कधीच लादले नाही, मात्र निर्बंध जबरदस्त कडक केले होते. त्यांच्याकडे लॉकडाऊन असे म्हटले तरी गर्दी रोखण्यासाठी केलेले उपाय असाच होता. त्यामुळे या विकसित देशांनी आपले अर्थकारण थांबणार नाही, याची कोरोना काळातही दखल घेतली. त्याविरुद्ध आपल्याकडे लॉकडाऊन म्हणजे मुंबईसारख्या महानगरात घराघरात सर्व व्यवहार शंभर टक्के बंद असा पर्याय स्वीकारला. याचा परिणाम आपल्याकडील अर्थव्यवस्था ठप्प होण्यात झाली. याचा फटका सर्वच थरातील जनतेला बसला. सरकारलाही त्यांचे उत्पन्न बुडल्याने मोठा फटका बसला. त्यातून अर्थव्यवस्थेची गाडी आता कुठे रुळावर येत आहे, अशा स्थितीत पुन्हा लॉकडाऊन लागल्यास कठीण पाळी जनतेवर व देशावर आली असती याबाबत काही शंका नाही. सध्याच्या कोरोनाच्या ओमायक्रॉन व्हेरिएंटमध्ये आजारी पडणाऱ्यांचे प्रमाण मोठे असले तरी रुग्ण बरे होण्याचे प्रमाणही जास्त आहे. त्यामुळे काही तज्ज्ञांच्या मते, हा व्हेरिएंट एखाद्या साध्या तापासारखा ठरण्याची शक्यता जास्त आहे. या रुग्णांची पाहणी करुन जे अभ्यास प्रसिद्ध झाले आहेत, त्यानुसार या व्हेरिएंटद्वारे जे आजारी पडत आहेत, त्यांच्या जीवाला फारसा धोका नाही. पुढे चालून काही तज्ज्ञांच्या मते, हा आजार झपाट्याने सर्वांमध्ये पसरुन त्याद्वारे जनतेची प्रतिकारशक्ती वाढेल व एकूणच या रोगाचा समारोप होईल. अगदी शंभर टक्के समारोप झाला नाही तरी त्याचा प्रभाव कमी होईल व अन्य संसर्गजन्य रोगांप्रमाणे त्याचे स्वरुप भविष्यात राहील. अर्थात, हे सर्व अंदाज आहेत, त्यामुळे खरे होतीलच असे ठामपणाने सांगता येत नाहीत.

भविष्यात आपल्याला कोरोनाशी लढा देण्यासाठी लसीकरणाचा वेग वाढविला पाहिजे, आपल्याकडे लवकरात लवकर शंभर टक्के लसीकरण कशा प्रकारे होईल त्याची आखणी केली पाहिजे. त्याचबरोबर मुलांच्या सुरु झालेल्या लसीकरणानेही वेग पकडला पाहिजे. तसेच बुस्टर डोस देण्यासंबंधी सर्व तयारी पूर्ण झाली पाहिजे. केवळ ६० वर्षावरील नव्हे तर, ज्यांचे दोन डोस पूर्ण झाले आहेत त्या सर्वांनाच बुस्टर डोस दिला गेला पाहिजे. येत्या वर्षात सर्वांना बुस्टर डोस देण्याचे उद्दिष्ट बाळगले पाहिजे. ही उपाययोजना करीत असताना सध्या ज्यांना लक्षणे आहेत त्यांचीच तपासणी करण्याकडे सरकारने लक्ष पुरविले पाहिजे. कारण, ज्यांना लक्षणे नाहीत अशांची चाचणी करण्यापेक्षा ज्यांना लक्षणे आहेत त्यांना तपासून सरकारने जास्त फोकस राहिले पाहिजे. लॉकडाऊन न लादता जे उपाय योजले पाहिजेत त्याची आखणी राज्य सरकारने आता केली पाहिजे. जनतेनेही आता आपली जबाबदारी ओळखून वागले पाहिजे. मास्क वापरणे, अनावश्यक गर्दीची ठिकाणे टाळणे, हे जनतेच्या हाती आहे. त्याची कडक अंमलबजावणी करणे हे जनतेच्याच हाती आहे. कोरोना अजून किती वर्षे चालेल, हे आता काही सांगता येत नाही, त्यामुळे जे आपल्या हाती आहे, त्यानुसार कोरोना पसरु नये यासाठीची कडक अंमलबजावणी केली पाहिजे. २०२२ साली कोरोना संपेल असा अनेकांचा अंदाज होता; परंतु कोरोना अजून काही काळ सुरु राहील, असा अंदाज आहे. एवढ्या प्रदीर्घ काळ आपण अर्थकारण ठप्प ठेवू शकत नाही. त्यामुळे काम करता-करता कोरोनाशी लढा दिला पाहिजे.



# मोहोर



दृष्टिक्षेप
अतुल गुळवणी
९२७०९२५२०१

## लख लख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया






मराठी चित्रपटसृष्टी आणि मराठी माणूस यांचे अतूट असं नातं राहिलेले आहे. २१ फेब्रुवारी १९१३ रोजी दादासाहेब फाळके यांनी 'राजा हरिश्चंद्र' या पहिल्या मराठी चित्रपटाची निर्मिती करुन मराठी चित्रपटसृष्टीचे रोपटे महाराष्ट्राच्या अंगणात रोवले. गेल्या ११० वर्षांच्या कालखंडात या रोपट्याचे वटवृक्षात रुपांतर होऊन त्याच्या फांद्या, पारंब्याही आता मराठी भूमीत चांगल्या प्रकारे रुजल्या आहेत. त्या इतक्या रुजल्या आहेत, की त्याच्या जोरावर आणखी शंभर वर्षे मराठी चित्रपटसृष्टी आणखी बहरत राहील, यात तिळमात्र शंका नाही.

पूर्वीच्या काळी भजन, कीर्तन, तमाशा आदींमधूनच करमणूक, मनोरंजन होत असे. त्यावर मराठी माणूस आपली सांस्कृतिक भूक भागवित असे. पण, जसजसे सिनेमाचे युग अवतरले, तसतसे रसिकांची अभिरुची बदलत गेली आणि पडद्यावरील हलते चित्र पाहण्यात रसिकांना जास्त आनंद वाटू लागला.

दादासाहेब फाळके यांनी जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये नाटक आणि फोटोग्राफीचं शिक्षण घेतलं. पुढे सिनेमाचं शिक्षण घेण्यासाठी त्यांनी जर्मनी गाठली. तिथे त्यांनी सिनेमाचं तंत्र शिकलं आणि मग पुन्हा आपल्या मायदेशी परतून सिनेमा बनवण्याचं ठरवलं. साल होतं १९१३. या क्रांतिकारी वर्षात भारतात पहिला सिनेमा तयार झाला. हा चित्रपट बनवण्यासाठी त्यांना १५ हजार रुपये खर्च आला होता. दादासाहेब फाळके यांनी १९ वर्षांच्या त्यांच्या करिअरमध्ये ९५ चित्रपट बनवले. २७ शॉर्ट फिल्म बनवल्या. 'द लाईफ ऑफ क्रिस्ट' हा सिनेमा त्यांच्या आयुष्यातील 'टर्निंग पॉइंट' ठरला. हा सिनेमा तयार करण्यासाठी त्यांनी आपल्या पत्नीचे दागिने गहाण ठेवले होते. हा सिनेमा तयार करण्यासाठी त्यांना सहा महिने लागले. 'सेतूबंधन' हा त्यांचा शेवटचा मूकपट ठरला. दादासाहेब फाळके यांच्यानंतर मराठी चित्रपटसृष्टीत अनेक निर्माते, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, कलावंत निर्माण झाले. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने मराठी सिनेमाची पताका जगाच्या पाठीवर सर्वत्र पोहोचवली. आज अन्य भाषांप्रमाणे मराठी भाषेतील सिनेमाही मोठ्या दिमाखात आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रदर्शित होत आहे. हे नसे थोडके.

सन १९२० ते ३० च्या दशकात अनेक ऐतिहासिक, सामाजिक विषयांच्या चित्रपटांची निर्मिती करण्यात आली. त्यातून सामाजिक संदेश देण्याचे काम दिग्दर्शक, निर्मात्यांनी केले. पुढे अभिरुची बदलत गेली आणि मराठी सिनेसृष्टीत तमाशाप्रधान आणि ग्रामीण भाषेतील सिनेमाची चलती सुरु झाली आणि खऱ्या अर्थाने मराठी रसिक सिनेमाकडे जास्त आकृष्ट झाले. भालजी पेंढारकर यांचेही मराठी सिनेमात मोठे योगदान आहे. त्यामुळे त्यांना 'चित्रतपस्वी' असे मोठ्या आदराने बोलले जात असे. भालजीबाबा हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे निस्सीम भक्त. त्यामुळे त्यांनी मराठी सिनेमाच्या माध्यमातून शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित अनेक दर्जेदार ऐतिहासिक सिनेमाची निर्मिती करुन एकप्रकारे मराठेशाहीचा इतिहास सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले. चित्रपती व्ही. शांताराम, अनंत माने, कमलाकर तोरणे, दिनकर पाटील आदी दिग्गज दिग्दर्शक, निर्मात्यांनी दर्जेदार मराठी सिनेमाची निर्मिती करीत मराठी सिनेसृष्टीत इतिहासच रचला. तमाशाप्रधान चित्रपटाच्या लाटेत 'सांगते ऐका', 'पिंजरा' असे अनेक सिनेमे मराठी रसिकांच्या पसंतीला उतरले. मास्टर विनायक, राजा परांजपे, ग.दि. माडगुळकर, व्ही. शांताराम यांनी निर्मित आणि दिग्दर्शित केलेला 'पिंजरा' हा आजही तितक्याच आवडीने पाहिला जात आहे. या सिनेमातील गीते, कथा, पटकथा, संगीत एकापेक्षा एक दर्जेदार ठरले. या सिनेमातील कलावंतही तितकेच ताकदीचे आणि दर्दी होते. त्यामुळे या सिनेमाने रसिकांच्या मनात कायमच अढळ स्थान मिळविले. पिंजरासारखे अनेक तमाशाप्रधान सिनेमे मराठी रसिकांना नेहमीच प्रभावित करीत राहिले. ग्रामीण भागातील रसिकांची तर यामुळे सिनेमागृहाकडे पावले पडत राहिली. आजही एखादा मराठी ग्रामीण भागातील सिनेमा प्रदर्शित झाला, तर मराठी रसिकांची पावले आपोआपच सिनेमागृहाकडे वळतात, हे कुणीही नाकारु शकत नाही. अगदी अलीकडच्या काळात प्रदर्शित झालेला 'नटरंग' हादेखील या पठडीतील सिनेमा ठरलाय. रवी पाटील दिग्दर्शित या सिनेमाने मराठी रसिकांची निश्चित वाहव्वा मिळविली आहे. मराठी रसिक हा चोखंदळ. त्यामुळे त्याला जे आवडतो, त्याची तो निश्चितच वाहव्वा करतोच. तसेच मराठी सिनेमाच्याबाबतीत घडले आहे. घटकाभर करमणूक होताना ती निखळ आणि मनाला आनंद देणारी असावी, अशीच त्याची इच्छा असते. ती सिनेमाच्या माध्यमातून मिळाली तर त्याला होणारा आनंद काहीच औरच असतो. आतापर्यंत हजारो सिनेमे निर्माण झाले. पण, ते सगळेच काही मराठी प्रेक्षकांच्या पसंतीला पडले असे म्हणता येणार नाहीत. अनेक सिनेमे कधी निर्माण झाले, हे कुणालाच कळले नाही. तर, जे सिनेमे मराठी प्रेक्षकांना मनापासून भावले, ते आजही तितकेच लोकप्रियतेच्या शिखरावर आहेत, हे विसरुन चालणार नाही. सिनेमा निर्माण करताना त्याची भट्टी जमली तर तो यशस्वी होतो. हे अनेक सिनेमांतून दिसून आलेले आहे. अनेक सिनेमात कथा, पटकथा दर्जेदार असते, तर गाणी ही सुमार दर्जाची झाली तर मराठी प्रेक्षकांना ते आवडत नाही. उलट, अनेक सिनेमांत गाणी सुपरहिट होतात; पण कथा सुमार आणि कलावंतही नवखे असले तर तोही सिनेमा फार काळ चालला असे काही दिसून आलेले नाही. हे अनेकदा घडले आहे. तमाशाप्रधान सिनेमाप्रमाणेच विनोदी सिनेमेही मराठी रसिकांना नेहमीच हसवत ठेवत आलेले आहेत.

आजही एखादा जुना विनोद सिनेमा एखाद्या चॅनेल्सवर दाखविला जात असेल तर पुनः पुन्हा पाहण्यात वेगळाच आनंद वाटतो. विनोदी सिनेमाची उंची दामूअण्णा मालवणकर, शरद तळवळकर, वसंत शिंदे, दादा कोंडके, अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, विजय चव्हाण, विजय कदम आदी दिग्गजांनी इतकी उंच करुन ठेवली आहे, की त्या उंचीला खाली आणणेच अशक्य आहे. दादा कोंडके यांचे मराठी चित्रपटसृष्टीत मोठे योगदान आहे. दादांनी विनोदी धाटणीचे आणि ग्रामीण भागाशी निगडीत असे दर्जेदार सिनेमे निर्माण केले. त्यामुळे मराठी सिनेसृष्टीचे भाग्य फळफळले. आज दादा हयात नाहीत, पण त्यांनी निर्माण केलेले सर्वच सिनेमे आजही पाहताना दादांची आवठवण आल्याशिवाय राहात नाही. दादांप्रमाणेच अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे यांनीही मराठी विनोदी सिनेमांसाठी दिलेले योगदान विसरता येणार नाही. दुर्दैवाने लक्ष्मीकांत बेर्डे यांचे लवकर निधन झाले. पण, त्यांनी दोन दशकांत मराठी सिनेमात जो काही झंझावात निर्माण केला, तो अविस्मरणीय असाच आहे. अशोक सराफ आज पंचाहत्तरीचे आहेत. तरीही ते आपला अभिनय टिकवून आहेत. विविध प्रकारच्या भूमिका त्यांनी साकारुन आपल्यातील अभिनेता जिवंत ठेवला आहे. पुरुष कलावंताप्रमाणेच स्त्री कलावंतही मराठी सिनेसृष्टीत अग्रेसर राहिलेले आहेत. त्यांचेही योगदान मराठी सिनेसृष्टी जिवंत ठेवण्यात मोठे आहे. आज मराठी सिनेमा खऱ्या अर्थाने बदलला आहे. मोठ्या प्रमाणात नवीन पिढी वेगवेगळे विषय घेऊन मराठी रसिकांचे मनोरंजन करताना दिसत आहे.हे निश्चितच अभिमानास्पद आहे. सोमवारी मराठी सिनेसृष्टी ११० वर्षांची होत आहे. ती आणखी बहरत राहो, ही मनोकामना.



कवडसे
मंगल आठवले-गोगटे
९८२००००००२४

# पानं आणि फुलं





झाडांच्या पानांमध्ये काय ते असं विशेष असायचंय? पण असतं आणि बारकाईने पाहिलं तर दिसतंही. सुरूच्या बारीक रेषांसारख्या पानांपासून ते शेवग्याच्या शेंगांच्या वा टाकळ्याच्या लहानग्या गोल पानांपर्यंत, निगुर्डीच्या वा कण्हेरीच्या लांबटसर पानांपर्यंत, पपयाच्या मोठ्या हातभर पानापासून ते कासाळूच्या दोन हातभर पानापर्यंत, केळीच्या झोपण्यासारख्या लांबलचक पानापासून ते माडाच्या झावळीपर्यंत सगळ्या आकारांची, रुपांची आणि फिक्कट पिवळ्या ते काळपट हिरवट रंगापर्यंत सगळी पानं आपल्याभोवती दिसत, भिरभिरत असतात. शिवाय, काटेरी निवडुंगाचे फणे दिसतातच काटे घेऊन उभे, तर कधी लालचुटूक लहान-मोठी फळं घेऊन. हे सगळं मी पाहिलंय अलिबागमध्ये, माझ्या आजूबाजूला.

अनेकदा लहानपणी आईबरोबर वा जरा मोठं झाल्यावर मैत्रिणींबरोबर फिरताना ही सगळी झाडं पानं होतीच. त्यांची कधी मुद्दाम ओळख करून दिली नाही कुणी; पण घरातल्यांचीच कुणी ओळख का देतं करून? ती सगळी होतीच आजूबाजूला. माझ्याबरोबर तीही मोठी होतच होती. समुद्रावर गेलो की तिथे कण्हेरीची झाडं असायची. त्याचा रंग आणि वास मनात पक्का झालेला आहे. तिथे गेलं तर वाळूचे किल्ले करून त्यावर सुरूची फळं (हिरवा ते तपकिरी रंग) आणि कुंपणाच्या झाडांवरच्या (मेंदा) पांढऱ्या फुलांची सजावट करण्यापलीकडे काय होतं करण्यासारखं? फुगे, भिरभिरं असलं काही वा खायलाही नसायचं. मग आई दोन पानं कण्हेरीची काढून, ती एकमेकांच्या जवळ धरून, त्याचाच टिकी-टिकी आवाज करत असे. मग आम्हीही ती गंमत शिकलो.

व्यायामशाळेच्या (आता एसटी स्टँडच्या असं म्हणू या, कारण व्यायामशाळा आता आहे की नाही ते माहीत नाही.) बाजूला गेलो फिरायला तर तिकडे असलेल्या एरंडाच्या जंगलातून त्यातली लहानशी फांदी आई तोडे आणि मग त्या फांदीतून पडणारा चीक त्यातल्याच एका पानात गोळा करे. पानाजवळच्या फांदीचा लहानसा बोटभर तुकडा मोडून त्या नळीचं एक टोक पानातल्या चिकात बुडवून दुसऱ्या टोकाने त्यात हळुवार फुंकर घालून त्यातून लहान फुगे काढत असे. आम्ही तेही शिकलो.

आम्ही अशा अनेक गोष्टी शिकलो वा समजलो, ज्या शाळेत शिकवल्या जात नाहीत. अर्थात, त्या मुद्दाम शिकविल्याही गेल्या नाहीत, तर बघून-पाहून-करून आम्ही समजलो. शेवग्याच्या शेंगा झाडावरून कधी काढाव्या, मायाळूची पानं कशी ओळखावी, माडाच्या झाडावर कसं चढावं, वड्या करण्यासाठी अळूची पानं एकमेकांवर बेसनाने कशी लावावी, बकुळीची माळ करण्यासाठी केळीच्या झाडाचा सोप कसा काढावा, तुळशीच्या पानांचा काय उपयोग असतो, रायआवळे झाडावर कधी तयार होतात, कडुलिंबाच्या पानांचा रस कशावर गुणकारी असतो, पांढऱ्या सदाफुलीच्या पानांचा काय उपयोग... या व अशा कित्येक गोष्टी आम्ही आपोआपच शिकलो. शिकलो की निसर्गातील प्रत्येक पाना-फुला-फळांचा आणि झाडांच्या खोडाचा स्पर्श वेगळा असतो, तो जाणवायला हवा.

मायाळूच्या वा ओव्याच्या पानांची भजी आता अनेक वर्षांत खाल्लेली नाहीत. शेवग्याच्या शेंगा ज्या मिळतील, त्या घ्याव्या लागतात. बकुळीची फुलं विसरायला झालंय. तुळशीची पानं विकत घ्यावी लागतात. त्याच्या काड्या चिघळलेल्या कानावर उपाय असतात, हे इथे कुणाला माहीत नसतं. रायआवळे तर विकतही मिळत नाहीत. अळूचं फदफदं म्हटलं की आजूबाजूचे फिदी-फिदी हसतात. किती जणांना हे माहिती आहे, की निगुर्डीची पानं अंगदुखीवर उपयोगी येतात, रूईची पानं गुडघेदुखीवर रामबाण उपाय आहे. ही झाडं भरपूर ऊन असेल तिथे वाढतात आणि त्याला दोन रंगांची फुलं येतात, पांढरी व हल्की जांभळी पांढरी फुलं असणाऱ्या झाडाला 'मांदार' असंही म्हणतात आणि याच्यापाशी गणपतीचा वास असतो, असं म्हणतात. जांभळसर फुलांची रूईची पानं हनुमानाला अर्पण केली जातात. खेड्यांमध्ये रूईचं लहान पान बाळाच्या तेल लावलेल्या टाळूवर ठेवलं जातं. झिपरीची पानं फुलांच्या वेणीत घातली जातात. त्याचेही दोन प्रकार; कातर व साधी झिपरी. त्याकाळात गजऱ्याइतकीच फुलांची वेणीदेखील मिळायची. आणि वेणी कोणत्याही बाईला वा देवीलासुद्धा चालायची. त्यात कलाबूतसुद्धा असायची.

फुलांबरोबर एक-दोन पानंदेखील केसात माळली जात. पानांशिवाय तर फुलांचा गुच्छदेखील बनवला जात नाही. माझी सगळ्यात आवडती वाळल्यावरही गंध देणारी बकुळीची फुलं. हौदाच्या चौकातून पाहिलं तर एका बाजूला शंकराचं देऊळ, ज्याच्या बाहेर देवचाफ्याचं झाड होतं आणि दुसऱ्या बाजूला 'जोगळेकर ट्रानस्पोर्ट' चं ऑफिस होतं. (आता तेथे हौद नाही.) त्याच्या मागच्या बाजूच्या आवारात बकुळीचंएक झाड होतं, कदाचित दोन होती. आम्ही मुली संध्याकाळी तिथे जाऊन झाडावरुन पडणारी ताजी फुलं वेचून लगेच केळीच्या सोपात ओवायचो. सर पटापट लांब होत जायचा. अनेक वेळा फुलांची वाट बघत वर बघितलं जायचं, त्यावेळी खाली पडणारं फूल दिसलं तर ते दृश्य विलोभनीय असायचं. हिरव्या गडद पार्श्वभूमीवर ते पांढरट फूल स्वत:भोवती गोल फिरत हळूहळू जमिनीकडे यायचं. ते सर वाळले की कपाटात ठेवायला उपयोगी येत. मंद सुवास देत ते तिथे आपण काढेपर्यंत तिथे राहात. आता क्वचित दिसणाऱ्या फुलांच्या यादीत मी ते नाव टाकलं आहे.

तशीच खूप फुलं मिळायची- गवताची! आम्ही त्या फुलांना भेंडाची फुलं म्हणत असू. ही फुलं लहान, गोल आणि छोटं डेख असणारी होती. पिवळट-पांढरट ते हलक्या तपकिरी रंगाची असायची. हिरकुटाच्या लांब काड्यांना, आई, ती दोऱ्याने बांधायची व त्यांचे तुरे बनवून फुलदाणीत सजवून ठेवायची. फुलं वाळली की ते तुरे पाण्यात बुडवून ती फुलं परत एकदा ताजीतवानी व्हायची. अशा तऱ्हेने खूप दिवस टिकत असत ती. दुसरी गेंदाची फुलं. तीदेखील गवताचीच फुलं. किरमिजी रंगाचे लहानगे गोल सुंदर दिसत. तेही घरी आणले जात. आणि कुर्डुची फुलं. खाली गोलसर पांढरट आणि वरच्या बाजूला टोकेरी होत गेलेली व किरमिजी होत जाणारी. ही फुलं घराच्या दाराला नव्याचं जे तोरण बांधलं जातं, त्यात असायची.

अशी तर कितीतरी फुलं असतात, गवतावर फुललेली, पण कुणाचं फार लक्ष जात नाही अशी. तरीही काही ना काही कारणाने ती आपली नजर तिकडे वळवून घेतातच. जसं आपले काही सण. गौरीची पूजा करताना जी फुलं वापरली जातात ती, लाल-पिवळी कातर पाकळ्यांची, मला नेहमी रस्त्याबाजूच्या गवतातच दिसली आहेत. घाणेरी, कोरांटीदेखील! लहान, मोठी, सगळ्या रंग-रूपाची, सगळ्या आकाराची फुलं माझ्याकडे बघून स्मित करत आहेत, असं मला नेहमीच जाणवलंय.




पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
९२७३३४३१७७

वाचनीय आणि संग्राह्य

# साहित्य शिल्प

पुस्तकाचे नाव : साहित्य शिल्प
लेखक : वामन रघुनाथ दिघे
प्रकाशक : उज्ज्वला दिघे, श्रीश्रीरंग सोसा.सी२/७ अरिहंत गार्डन, लक्ष्मीनगर, खोपोली - रायगड ४१० २०३
प्रकाशन: दिनांक २५.०३.२०२१.
पृष्ठे : १२१, स्वागत मूल्य : दोनशे रुपये.

साहित्य शिल्प - कै.र.वा.दिघे हे वामन रघुनाथ दिघे यांचे पुस्तक देखण्या रूपात प्रकाशित करण्यात आले आहे. कै.र.वा. दिघे यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्षाचे औचित्य साधून, त्यांच्या साहित्य जीवनावर हे पुस्तक लिहिले गेले आहे. 'प्रस्तावना'मध्ये वामन दिघे यांनी या पुस्तकाची पार्श्वभूमी मांडली आहे. वामन दिघे यांच्या वडिलांनी आत्मचरित्र लिहिले नाही. कारण ते प्रसिद्धीपासून वंचित आणि अलिप्त होते.कै.र.वा.दिघे (२५.३.१८९६ - ४.७.१९८०)यांनी एकूण एकवीस पुस्तके लिहिली. खोपोली ही त्यांची साहित्यिक निर्मितीची भूमी होती. सुरुवातीला त्यांच्या जीवनातील विविध टप्पे सविस्तरपणे मांडल्याने, त्यांच्या जीवन आणि कार्याची वाचकाला ओळख होते. त्यानंतरच्या बावीस लेखांतून दिघे यांच्या साहित्यिक कामगिरीची महत्ता उलगडत जाते. पुस्तकाचे रंगीत मुखपृष्ठ समर्पक आणि आकर्षक झाले आहे.




पहिल्या तीन लेखांतून वामन दिघे यांनी खोपोलीची साहित्य वाटचाल, वडिलांच्या आठवणी तसेच खोपोली हे एका साहित्यिकाचे गाव कसे होते हे स्पष्ट केले आहे. कै. दिघे यांची खोपोलीतील साहित्यिक वाटचाल १९३९ ते १९८० पर्यंत सातत्याने सुरू होती. र.वा.दिघे यांचा जन्मशताब्दी महोत्सव कार्यक्रम खोपोलीत कसा साजरा झाला त्याचे वर्णन वाचावयास मिळते. त्यानंतर गेली पंचवीस वर्षे को.म.सा.प.तर्फे विविध साहित्यिक कार्यक्रम खोपोली शहरात घेतले गेले. वडिलांच्या साहित्यनिर्मितीच्या विविध आठवणी वामन दिघे यांनी मांडल्या आहेत. ते आपले सर्व लेखन निसर्गाच्या सान्निध्यात करीत असत. मराठी, संस्कृत आणि इंग्रजी भाषांवर त्यांचे प्रभुत्त्व होते. संगीताचीही त्यांना प्रचंड आवड होती. खोपोली शहराची ओळखही करून दिली आहे. र.वा.दिघे यांनी सामाजिक बांधिलकीतून कोणती कामे केली हे वामन यांनी स्पष्ट केले आहे. उज्ज्वला दिघे यांनी निसर्गकवी म्हणून कै. दिघे यांची सोदाहरण ओळख करून दिली आहे. र.वा. दिघे यांच्या पूर्वप्रकाशित लेखांतून त्यांची साहित्यिक वाटचाल कशी झाली हे समजते.खोपोलीतील विविध बदल एका लेखातून उत्तम प्रकारे टिपले गेले आहेत.

**उंबराचे फूल...** हा उर्मिला अवसरीकर (कै.दिघे यांची कन्या) यांचा सविस्तर, पूर्वप्रकाशित लेख अतिशय उत्तम आणि हृद्य झाला आहे. त्यांच्या घरातील वातावरणाचे नेमके चित्र त्यांनी शब्दांनी रेखाटले आहे. निराशेच्या क्षणी त्यांना बाबांचे जीवन जगायचा संदेश देते. ''र.वा.दिघे-एक अद्‌भुत कलावंत'' हा गंगाधर गाडगीळ यांचा लेख त्यांच्या साहित्याचे विशेष स्पष्ट करतो. दिघे हे खरेखुरे एकांडे लेखक होते. त्यांनी ग्रामीण जीवनाचे, त्याच्याशी समरसून दर्शन घडवीत होते. आनंद यादव, न. चिं. केळकर यांनीही दिघे यांच्या साहित्यातील योगदानाचे महत्त्व जाणले होते. त्यांच्या लेखांतून ते चिकित्सकपणे मांडले गेले आहे. मधु मंगेश कर्णिक, बाबा कदम, मधुकर भावे, श्री. ग. माजगावकर, डॉ. माधव पोतदार, एस. एम. देशमुख या साहित्यिकांचे लेखन दिघे यांचे लेखन विशेष स्पष्ट करतात.

डॉ. रवींद्र ठाकूर यांनी र.वा.दिघे यांच्या कादंबरी लेखनावर लिहिलेल्या प्रबंधाला पुणे विद्यापीठाने १९८९ मध्ये पीएच.डी. पदवी प्रदान केली. त्यांचा कादंबरीकार र.वा.दिघे हा लेख अभ्यासपूर्ण आणि वाचनीय आहे. त्यांच्या मते, महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचा वास्तवाश्रयी अविष्कार घडविणारे आणि मराठी कथात्मक साहित्यात ग्रामीण साहित्याचा प्रवाह निर्माण करणारे कादंबरीकार म्हणून र.वा.दिघे यांचे स्थान मराठी कादंबरीच्या इतिहासात निश्चितच महत्त्वाचे आहे. त्यांच्या कादंबरीच्या मर्यादा मान्य करूनही, त्यांच्या कादंबरीमुळेच पुढील काळात ग्रामजीवन चित्रणाच्या शक्यता रुंदावल्या हे निःसंशय. 'पाणकळा' आणि 'सराई' च्या रूपाने त्यांनी एक नवे अनुभवविश्व मराठी कादंबरीत आणले. डॉ.मृणालिनी गोसावी, रमाकांत श्रीखंडे यांनी र.वा.दिघे यांचे अप्रकाशित साहित्य आणि द ड्रीम दॅट व्हॅनिश्ड या नाटकावर लिहीले आहे. या नाटकाला विश्वसाहित्य स्पर्धेत सहावा क्रमांक मिळाला होता. उज्ज्वला दिघे यांनी साहित्यिक घराण्याचा वारसा पुढे चालू ठेवल्याचे शेवटी वामन दिघे यांनी लिहिले आहे. विविध कृष्ण-धवल छायाचित्रांमुळे हे पुस्तक वेधक ठरले आहे. मात्र लहान-मोठे, अनेक मुद्रणदोष खटकतात. ते टाळायला हवे होते.



विशेष
श्रद्धा वार्डे
९७६७१५२६०८

# चीन लाओस संबंध

गेल्या महिन्याच्या अखेरीला लाओसमध्ये एका चिनी कंपनीच्या कार्यालयाबाहेर मजुरांनी आंदोलन केलं, प्रवास भत्ता वाढवून मिळावा या मागणीसाठी चिनी नागरिकांनी लाओस या देशात हे आंदोलन केलं. चिनी खाण कामगार चिनी कंपनीच्या बाहेर आंदोलन करत होते. आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांना पाचारण करण्यात आलं तेव्हा आंदोलकांनी पोलिसांच्या बंदुका खेचून घेतल्या. आंदोलन नियंत्रणात आणण्यासाठी अखेर लाओ अधिकाऱ्यानी हवेत गोळीबार केला. या घटनेविषयी फारशी माहिती उपलब्ध झाली नाही. लाओसच्या स्थानिक माध्यमांनी या घटनेची दखल घेतली. त्यांनतर एक प्रश्न निर्माण झाला तो म्हणजे, चिनी खाण कामगार लाओसमध्ये काय करत होते.

चीन आणि लाओसमध्ये गेली ६० वर्ष राजनैतिक संबंध आहेत. चीनप्रमाणे लाओसमध्ये पण कम्युनिस्ट राजवट आहे. १९ व्या शतकात लाओस फ्रेंच वसाहत होती. १९६१ पासून चीन आणि लाओस यांच्यात मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले. बेल्ट रोड प्रकल्पांतर्गत बीजिंग ते लाओसची राजधानी वाएन्टाईन रेल्वे प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. डिसेंबर महिन्यात हा रेल्वे मार्ग सुरु झाला. या मार्गामुळे लाओसला अधिक फायदा होईल असा दावा चिनी अध्यक्ष षी जिनपिंग यांनी केला आहे. चीन बरोबरच लाओस व्हिएतनाम, थायलंड, म्यानमार आणि कंबोडिया हे लाओसचे शेजारी देश आहेत. लाओस रेल्वे प्रकल्प या देशांपर्यंत विस्तारित करण्याचा चीनचा मानस आहे. सुमारे एक हजार किलोमीटरचा हा रेल्वे मार्ग खुनामिंग शहरामधून पुढे जातो. लाओसमधील रेल्वे मार्गाचं बांधकाम २०१६ मध्ये सुरु झालं तर चीनमधील रेल्वे मार्गच बांधकाम २०१५ मध्ये सुरु करण्यात आलं. रेल्वे प्रकल्पामुळे लाओस इतर देशांशी रेल्वे मार्गाने जोडला जाईल असा विश्वास चीनला आहे. लाओस बरोबर चीनला या रेल्वे मार्गाचा फायदा होणार आहे. या रेल्वेमार्गामुळे अग्नेय आशियातील देश रेल्वेने चीनला जोडले जाणार आहेत. यामुळे व्यापार वाढायला उपयोग होणार आहे. पण या प्रकल्पात ज्या लाओ नागरिकांच्या जमिनी गेल्या आहेत त्या नागरिकांना अजून मोबदला मिळाला नसल्याची तक्रार पण आहे.



लाओसमध्ये असलेल्या पोटॅशच्या खाणींमध्ये चीनला स्वारस्य आहे. नायट्रोजन आणि फॉस्फरस बरोबर पोटॅशलाही मागणी आहे. उत्तर चीनमधील शेतकरी गहू आणि सियाबीनच्या शेतीसाठी पोटॅशचा वापर करतात. चीनमध्ये पोटॅश आयात केल जात. जागतिक बाजारपेठेत पोटॅशचा दर वाढतो तेव्हा चीन आणि अमेरिकेत पोटॅशचे दर सारखेच असतात. चीनमध्ये पोटॅशच्या खाणी आहेत १९९० ते २००० मध्ये पोटॅशचा शोध लागला. छिनहाय, षींनचियांग आणि युनान मध्ये मिळून वर्षाला १० लक्ष टन इतकं पोटॅशचे उत्पादन होतं. पण या भागातून चीनच्या इतर भागात पोटॅशची वाहतूक करणं खर्चिक आहे.

या वाहतुकीच्या खर्चापेक्षा आयात केलेलं पोटॅश स्वस्त पडतं. यासाठी चीनमध्ये आयात होणाऱ्या पोटॅशवर शून्य आयात कर आकारण्याचं धोरण पण लागू करण्यात आलं. लाओसमधून येणाऱ्या पोटॅशमुळे चीनला फार काही फायदा होणार असं नाही. लाओसमध्ये उत्पादन होणारं पोटॅश निर्यात केलं जातं. लाओसमध्ये जी चिनी कंपनी पोटॅशच उत्पादन करते, त्या कंपनीचं उत्पादन इंडोनेशियाला निर्यात होतं. लाओसमधील चिनी प्रकल्पांमध्ये मिळणार पोटॅश लाओसच्या इतर भागात आणि थायलंड सीमेवर पाठवलं जातं. ते पण चीन लाओस रेल्वे प्रकल्पामुळे.

चिनी कंपनी लाओसमध्ये पोटॅशचे उत्पादन घेते. त्याप्रमाणे लाओसमधील लोहखनिजाच्या खाणीचा शोध पण चीन घेत आहे. त्यासंदर्भातील सामंजस्य करार पण गेल्या वर्षी दोन देशांमध्ये झाला. तसंच सोन्याच्या खाणीचं काम पण चिनी कंपनीला मिळालं आहे. या खाणींमुळे नदीचं पाणी प्रदूषित होत असल्याची तक्रार गेल्यावर्षी आली होती. याबाबत स्थानिक नागरिकांनी तक्रार केली होती. नदीचा प्रवाह प्रदूषित झाल्याने स्थानिकांना अडचणी येत होत्या. चीनमध्ये उगम पावणारी मखोन्ग नदी लाओसमधून पुढे अग्नेय आशियात जाते. या नदीवर लाओस आणि इतर देशांना पाणी पुरवठा होतो.

पण या नदीवर चीनमध्ये बांधण्यात आलेल्या धरणांमुळे आणि वीज प्रकल्पांमुळे मखोन्ग नदीचं पाणी प्रदूषित होतं. यामुळे लाओसमधील मासेमारीवर परिणाम होत असल्याची तक्रार पण गेल्या वर्षी होती. तर चीनमध्ये धरणं भरल्यामुळे पाणी सोडण्यात येतं त्यामुळे लाओसमध्ये पूर येतो. अशा अनेक समस्या चिनी प्रकल्पांमुळे लाओसमध्ये निर्माण झाल्या आहेत. पण लाओस विकसनशील देश असल्याने आणि चीनकडून मदत मिळत असल्याने चिनी कंपन्यांचा स्थानिक नागरिकांना त्रास झाला तरी चीनला फारसा विरोध होताना दिसत नाही.

ओटीटीच्या अंतरंगात
अमृता वाडीकर

# बुडत्याला ओटीटीचा आधार...

ओटीटी व्यासपीठांनी लोकप्रियतेचं शिखर गाठलं आहे यात शंका नाही. या माध्यमाने अनेकांना नवी संधी उपलब्ध करून दिली. जुन्या जाणत्या, गुणवान कलाकारांना तारलं. या कलाकारांनी संधीचं सोनं केलं नसतं तरच नवल. बॉलिवूडमध्ये नामोनिशाण नसणाऱ्या अनेक अभिनेत्रींनी वेबजगतात दमदार पाऊल ठेवलं. म्हणूनच ओटीटी हे कलाकारांना नवी उभारी देणारं माध्यम म्हणून उदयाला आलं आहे.

बॉलिवूडच्या चमचमत्या दुनियेत प्रत्येकाला संधी मिळतेच असं नाही. मनोरंजन क्षेत्रात सातत्याने नवी गुणवत्ता दाखल होत असताना जुणेजाणते कलाकार काळाच्या ओघात मागे पडत जातात. गुणवत्ता ठासून भरलेली असतानाही त्यांच्याकडे दुर्लक्ष होतं. काही वर्षांपूर्वीपर्यंत असे कलाकार छोट्या पडद्याकडे वळत असत. अभिनय सुरू ठेवण्यासाठी म्हणा, चर्चेत राहण्यासाठी म्हणा किंवा पैसा कमावण्यासाठी म्हणा, अनेकांनी छोट्या पडद्यावर नवी इनिंग सुरू केली. टीव्हीजगतात मोठं नाव कम0ावलं. आज टीव्हीची जागा ओटीटी या माध्यमाने घेतली आहे. इंटरनेट क्रांतीमुळे ओटीटी वाहिन्या एका क्लिकवर उपलब्ध झाल्या आहेत. फावल्या वेळात अगदी निवांत असताना ओटीटीवरील कार्यक्रम बघता येतात. ओटीटी वाहिन्यांवर मनोरंजनाचा खजिना असतो. वेब सिरिजच नाही, तर दर्जेदार चित्रपटांची पर्वणीही मिळत असते. गेल्या दोन वर्षांमध्ये 'वर्क फ्रॉम होम' संस्कृतीप्रमाणेच 'वॉच फ्रॉम होम' ही संस्कृतीही रूजली आहे. 'घरच्या घरी मनोरंजन' हा परवलीचा शब्द झाला आहे. ओटीटी वाहिन्यांची लोकप्रियता शिखरावर पोहोचल्यामुळे बॉलिवूडमधले मोठे कलाकारही ओटीटीवर दाखल होत आहेत. ओटीटीने अनेक कलाकारांना नवी उमेद दिली आहे. बॉलिवूडमध्ये झाकोळली गेलेली गुणवत्ता आज ओटीटी वाहिन्यांमुळे प्रकाशमान झाली आहे. काळाच्या ओघात हरवलेले अनेक चेहरे आज ओटीटी स्टार्स झाले आहेत. त्यांच्याभोवती वलय निर्माण झालं आहेच शिवाय चाहत्यांची संख्याही दिवसेंदिवस वाढत चालली आहे. ओटीटीने या कलाकारांच्या पदरात भरभरून दान टाकलं आहे. स्पर्धेत टिकू न शकलेल्या तसंच वाढत्या वयामुळे चित्रपट करू न शकणाऱ्या अनेक तारका ओटीटीवरील वेब सिरिजमध्ये झळकत आहेत.




ओटीटीने गुणवान कलाकारांच्या कारकिर्दीला नवी दिशा मिळवून दिली आहे. म्हणूनच ओटीटी व्यासपिठाचं महत्त्व आज प्रचंड वाढलं आहे. बॉलिवूड कलाकारांची ढासळती कारकिर्द ओटीटीने सावरली आहे. बॉलिवूडमध्ये स्थिरस्थावर होण्यासाठी धडपडणाऱ्या पंकज त्रिपाठीला ओटीटीने नवी ओळख मिळवून दिली. 'मिर्झापूर' या वेब सिरिजने त्याला लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचवलं. पंकज त्रिपाठी हे नाव घराघरात पोहोचलं. 'मिर्झापूर' हा पंकज त्रिपाठीच्या कारकिर्दीतला मैलाचा दगड ठरला. आज पंकज त्रिपाठी हे नाव ओटीटी विश्वात चांगलंच गाजतंय. त्याच्या अभिनयाच्या गुणवत्तेला ओटीटीने न्याय मिळवून दिला आहे. मनोज वाजपेयी हे सुद्धा अभिनयक्षेत्रातलं मोठं नाव. 'सत्या'सारख्या चित्रपटातून समर्थ अभिनयाचं दर्शन घडवणारा हा अभिनेता बॉलिवूडमध्ये मागे पडला. ओटीटीच्या उदयानंतर त्याने मागचा-पुढचा विचार न करता कारकिर्दीला नवी झळाळी देण्याचा निर्णय घेतला. 'द फॅमिली मॅन' आणि 'फॅमिली मॅन २' या दोन्ही वेब सिरिजमध्ये मनोज वाजपेयी झळाळून निघाला. 'द फॅमिली मॅन'ने मनोजच्या कारकिर्दीला नवी दिशा दिली. आज तो ओटीटीविश्वातला मोठा स्टार आहे.

जयदीप अहलावत हे नाव अभिनयक्षेत्राला नवं नाही. जयदीप गेली १५ वर्षं चित्रपटक्षेत्रात आहे. मात्र 'पाताललोक' या वेब सिरिजने त्याला नवी ओळख मिळवून दिली. त्याचा धारधार अभिनय खऱ्या अर्थाने प्रेक्षकांपर्यंत पोहोचला. त्याने एक सशक्त भूमिका सादर केली. आज जयदीपकडे बरंच काम आहे. 'पाताललोक'ने आपल्याला नवी ओळख मिळवून दिल्याचं खुद्द जयदीपनेही मान्य केलं आहे. 'स्कॅम १९९२'मध्ये झळकलेला चेहरा म्हणजे प्रतीक गांधी. या वेब सिरिजमध्ये प्रतीकने सर्वोत्तम अभिनयाचं दर्शन घडवलं. त्याच्या अभिनयाचं प्रचंड कौतुक झालं. या सिरिजमुळे प्रतीक गांधी हे नाव बॉलिवूडमध्ये पोहोचलं. हंसल मेहता दिग्दर्शित स्कॅम १९९२ ही ओटीटी व्यासपीठावरील एक यशस्वी आणि दर्जेदार वेब सिरिज ठरली. दिव्येंदू शर्माने मिर्झापूरमध्ये मुन्ना त्रिपाठी ही व्यक्तिरेखा साकारली. त्याचा मुन्ना त्रिपाठी प्रेक्षकांना खूप भावला. या सिरिजनंतर दिव्येंदूकडे वेब सिरिजचे अनेक प्रस्ताव आहेत. आज तो कामात बराच व्यस्त आहे. अर्जुन माथुर हा चेहरा अनेक चित्रपटांमध्ये झळकला. 'मेड इन हेवन' या सिरिजमध्ये त्याने समलैंगिक व्यक्तिरेखा साकारली होती. अर्जुनने अनेक वेब सिरिजमधून विविधांगी भूमिका साकारल्या आहेत.

बॉलिवूडमध्ये सातत्याने अपयशी ठरणाऱ्या सैफला या वेब सिरिजने आधार दिला. त्याच्या कारकिर्दीची गाडी रूळावर आली. 'सॅक्रेड गेम्स'मुळे ओटीटी व्यासपीठांना लोकाश्रय मिळू लागला. या माध्यमाचा स्वीकार झाला. या सिरिजनंतर सैफला काही चांगले चित्रपटही मिळाले. अभिषेक बच्चननेही ओटीटीची वाट धरली. 'ब्रिद इन टू द शॅडोज' ही त्याची वेब सिरिज गाजली. त्याचे काही चित्रपटही ओटीटीवर प्रदर्शित झाले. 'आश्रम' या वेब सिरिजमुळे बॉबी देओलला अभिनयाची नवी संधी मिळाली. 'क्लास ऑफ ८३' या ओटीटीवरील चित्रपटातही तो झळकला होता. विवेक ओबेरॉय, शर्मन जोशी यांनाही ओटीटीने तारलं. थ्री इडियट्स, रंग दे बसंतीसारखे दर्जेदार चित्रपट करूनही शर्मन जोशीला बॉलिवूडमध्ये यश मिळू शकलं नाही. 'बारिश' या वेब सिरिजमुळे शर्मन पुन्हा प्रकाशझोतात आला.

बॉलिवूडमध्ये एक काळ गाजवणाऱ्या अभिनेत्री काळाच्या ओघात मागे पडल्या. चित्रपटांमध्ये त्यांच्यासाठी भूमिका नव्हत्या. कारकिर्द उतरणीला लागल्यानंतर काहींनी छोट्या पडद्यावर नशीब आजमावलं. रिॲलिटी शोजच्या परिक्षक म्हणून सहभागी झाल्या. मात्र आतला कलाकार त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. मग या अभिनेत्रींनीही ओटीटीची वाट धरली. ओटीटीने उपलब्ध करून दिलेली संधी साधण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ओटीटीवर या अभिनेत्रींच्या अभिनयाला वाव देणाऱ्या भूमिकाही होत्या. सुश्मीता सेनने 'आर्या' या वेब सिरिजमधून दमदार पुनरागमन केलं. या सिरिजमुळे तिच्या अभिनयाची एक वेगळी बाजू प्रेक्षकांसमोर आली. बॉलिवूडमध्ये तिला फारशी संधी मिळाली नाही. पण 'आर्या'ने सगळी कसर भरून काढली. रवीना टंडनने 'आरण्यक'मधून अभिनयाच्या दुसऱ्या इनिंगला सुरूवात केली ९० च्या दशकातली ही आघाडीची अभिनेत्री वेगळ्याच भूमिकेत दिसली. पूजा भट्टने 'बॉम्बे बेगम्स'मधून तर करिश्मा कपूरने 'मेंटरहूड'मधून ओटीटीवर पाऊल टाकलं. लारा दत्ता 'कौन बनेगी शिखरावती' या सिरिजमध्ये दिसली. माधुरी दीक्षितलाही ओटीटीची भुरळ पडली असून ती या वर्षी वेब सिरिजमध्ये झळकणार आहे.

या वर्षी देशात फाईव्ह जी क्रांती होणार आहे. त्यामुळे इंटरनेटचा वेग प्रचंड वाढणार आहे. या सगळ्यामुळे ओटीटी व्यासपीठांना लाभ मिळणार यात शंका नाही. ओटीटीची बाजारपेठ सातत्याने विस्तारते आहे. वेब वाहिन्यांची संख्या वाढते आहे. आज ओटीटी बॉलिवूडशी स्पर्धा करू लागलं आहे. त्यामुळे हाडाच्या कलाकारांसाठी संधींची कवाडं खुली होणार हे नक्की!




आठवण
डॉ. रमेश वार्डे
९३२६००४७४३

# गरजेतून विकास

जेवढी गावे जुनी पुराणी होतात तेव्हा त्यांना मोठा इतिहास लाभतो. गावे-शहरे टिकून राहतात तेव्हा ती निसर्गाच्या, लोकांचा आघात सोसून टिकून राहतात. त्या गावाचे स्थान बळकट होते. ते गाव दशक्रोशीमध्ये प्रमुख असते व तेथून स्थानिक व्यापार चालतो. त्या व्यापारामुळे त्या छोट्याशा जुन्या शहराला महत्व येते. म्हणून जुनी गावे, जुनी खेडी ही काळाच्या ओघात टिकून राहिलेली असतात. यावरुन असे दिसून येते की, काळाच्या ओघात टिकलेली शहरे, गावे ही यापुढे प्रसिद्ध गावे होतात. तसेच काही वैशिष्ट्ये त्याच्यामागे लावली की ते गावे आपोआप प्रसिद्ध होतात. अशी शहरे गरजेप्रमाणे निर्माण होतात असे दिसून येते.

असा जर विचार केला तर मुंबई शहर हे ताजे उदाहरण आहे. त्या गावाचा किनारा, पाण्याची गरज, जागेची गरज पाहता, खाजणातील जागा पुढे जगातील श्रेष्ठ जागा निर्माण होईल हे ब्रिटीशांनी ओळखले व त्यांनी महाप्रचंड मुंबईचा विकास करण्याचा निर्णय घेतला आणि मुंबई जशी निर्माण व्हायला लागली तसा परिसरही प्रगतीचा वेध घेऊ लागला.

मुंबईच्या दक्षिण बाजूला रायगड जिल्हा पसरला होता. सर्वत्र खाजणे होते. अशावेळी मुंबईत विकासाची झेप घेतल्यावर हे गाव आधीपासून वसलेले होते ते गाव मुंबईच्या विकासाला मदत करु लागले.व अशाप्रकारे परिसरातील गावांचा विकास होऊ लागला यामध्ये अलिबाग या गावाला मोठा इतिहास लाभला. त्यामुळे अलिबागचा विकास होणे शक्य झाले असे दिसून येते. लगतच रामनाथ हे जुने गाव होते ते आधीच वसलेले होते. असा उल्लेख प्रभाकर पाटील यांच्या एका भाषणात करण्यात आला होता व




जयंत भाई यांनी उल्लेख करुन पुनः ते अधोरेखित केला होता. ठिकरुळ नाका ते रावसाहेब रामराव नाईक यांचे घर इथे एकूण फारच थोडे कामानिमित्त येत असत. घरत आळी म्हणजे राम साहेबांच्या घरालगतचा परिसर म्हणजे पुढे मराठी शाळा व पुढे जुने मंदिर पलिकडे मिरची गल्ली येथे विठ्ठल मंदिर होते. शहराचा परिसर ते कोळीवाडा होता व ठिकरुळ नाका व वैद्य आळी हा परिसर तर सध्याच्या एस.टी. स्टँड परिसर होता.

एकूण जागा या स्वस्त असत त्यामुळे जागेला भाव यायला लागला व मुंबईकर इकडे वळले. तो भाग टाकाऊ समजत असत. कन्याशाळा, कोर्ट ऑफिस, कलेक्टर ऑफिस हे अलिबागलाच होते. त्यामुळे कुठे जाण्याचा प्रश्न येत नसे. एस.टी. बस सुरु झाली तेव्हा खाजण्यामध्ये पत्र्याचा नवीन बसडेपो सध्या विहीर आहे त्या भागात बांधला गेला व मग त्या पत्र्याच्या शेडमध्ये गाड्या येऊ लागल्या तर पोयनाडच्या व रेवदंड्याच्या जुन्या गाड्या रेवस स्टँड, जोगळेकर नाका येथे येत असत. बेलकडे करुन रोहा रस्ता त्यावेळी नव्हता.

अशा काळात व्ही. पी. राजा हे मुख्य कार्यकारी अधिकारी होते. त्यांना एस.टी. स्टँड जवळच खाजणाचा भाग होता त्याला हटवून इमारत बांधण्याची इच्छा होती तर याच्या काळात थोडे मागे पुढे श्री. प्रभाकर पाटील यांनी हेच खाजण हटविण्याचा निर्धार केला व तडजोड काढली. ती तडजोड यशस्वी होऊन पी.एन.पी. नगर निर्माण झाले तर याच काळात नगराध्यक्ष दत्ता खानविलकर यांनी श्रीबाग १, २, ३ खाजण परिसर नष्ट केला. लोकांची भरपूर सोय झाली व गावाचा परिसर वाढू लागला. त्यामुळे अलिबाग शहराची पुढील अडचण दूर झाली. तसेच मा. आ. दत्ता पाटील या नावाचे नगरपालिकेचे कार्यालय सुरु झाले.

याच काळात श्रीमती नाईक यांच्याकडे कार्यभार आला त्यांनी वृक्षारोपण आदी सर्व कामास मदत केली. तर त्यांच्यानंतर सौ. नमिता नाईक यांनी कार्यभार सांभाळला. अलिबाग विकासकामे यांसह पुढे प्रशांत नाईक हेच काम पाहू लागले व आता गाडी व्यवस्थित चालू आहे.

कविता

## स्वरलता

प्रभुकुंजातील स्वरलता तू
मं- मंतरलेले सूर तुझे
गे- गेयतेचा ध्यास तुला गं
श- शब्दांनाही भुरळ पडे
क- करीशी किमया
अलौकिक तू
र- रसिक मने रंगून जाती
ल- लकेर मंजुर तू घेता
ता- ताल सूर लय
किती जुळती
दी- दीप स्वरांचा अखंड तेवो
ना- नाम घेत मंगेशाचे
ना- नाते केवळ सप्त सुरांशी
थ- थवे जीवनी गीतांचे
उठता बसता निजतानाही
तुझेच गाणे ऐकावे
तुझ्या स्वरांच्या संगतीत
हे जगणे सुंदर व्हावे
सहस्त्रवर्षे रसिक मनावर
स्वरलतेने बहरावे
स्वरसम्राज्ञी गानकोकिले
अभिवादन स्वीकारावे...

- स्मिता सहस्त्रबुद्धे

# ‘जय भवानी जय शिवाजी’चा रायगडात जयघोष

## विविध उपक्रमांनी शिवाजी महाराजांना मानवंदना

## विविध गडकिल्ल्यांवरून शिवप्रेमींच्या शिवज्योती

*महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांना जयंतीनिमित्त शिवप्रेमींनी अभिवादन केले. रायगड जिल्ह्यातील विविध गड, किल्ल्यांसह सर्वत्र सार्वजनिक शिवजयंती साजरी करण्यात आली. शिवरायांचे आठवावे रुप, शिवरायांचा आठवावा प्रताप, यानुसार शिवप्रेमींमध्ये उत्साह संचारला होता. अनेक ठिकाणी रक्तदानासारखे सामाजिक उपक्रमसुद्धा शिवजयंतीनिमित्त घेण्यात आले. यावेळी मिरवणुका, शिवरायांच्या पुतळ्यांचेही पूजन करण्यात आले.*








छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त अलिबाग नगरपरिषदेच्या वतीने अलिबाग मधील अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करताना नगरसेवक तसेच अलिबाग शहरात मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी सहभागी झालेले शिवभक्त.

## माजी आ. पंडित पाटील यांच्या हस्ते
# छ. शिवाजी महाराजांवरील गाण्याचे प्रसारण

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त मा.आ.पंडित पाटील यांच्या हस्ते व महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय कर्मचारी संघटना (विद्युत) रायगड जिल्हा अध्यक्ष संजय जाधव व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित गाण्याचे ऑडिओ उद्घाटन करण्यात आले. या गाण्यासाठी राज रमेश धुमाळ यांनी संगीत दिले आहे व रमेश जगनाथ धुमाळ यानी हे गाणं गायलं आहे. संपूर्ण गाणं राज रेकॉर्डिंग स्टुडिओ नांगरवाडी येथे बनवले आहे. ह्या गाण्याचे व्हिडिओ शूट किशोर पाटील, योगेश भोईर व गाण्याचे एडिटिंग तनय संजय जाधव यांनी केलं आहे. हे गाणं आपण राज धुमाळ ह्या यूट्यूब चॅनल वे पाहू शकता. ह्या गाण्यासाठी सहगायक म्हणून लंकेश पाटील, केतन, धुमाळ, राणी धुमाळ यांनी केलं आहे. ह्या गाण्यासाठी निर्माता म्हणून रमेश बा धुमाळ, संजय जाधव यांनी केले आहे.



## सुतारवाडी येथे शिवजयंती साजरी

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

सुतारवाडी नाक्यावर संजय मुंबरे मित्र मंडळातर्फे प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षीही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित श्रींची पूजा, भजन आदी कार्यक्रम कोरोनाचे नियम पाळून करण्यात आले. संजय मित्र मंडळाचे अध्यक्ष संजय मुंबरे, उपाध्यक्ष राजूबुवा दळवी, सचिव प्रशांत तटकरे, खजिनदार वसंत मुंबरे तसेच सदाशिव कोदे आदिंनी शिवजयंती पार पाडण्यासाठी खूपच मेहनत घेतली.

## शिवजयंतीनिमित्त रूग्णवाहिकेचे लोकार्पण

**। पनवेल । वार्ताहर ।**

शिवजयंतीचे औचित्य साधून जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या पुढाकाराने खांदा कॉलनी, पनवेल आणि नवीन पनवेल मधील रुग्णांसाठी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या संकल्पनेतून ना नफा, ना तोटा या तत्वावर रुग्णवाहिका लोकार्पण सेवेचा शुभारंभ करण्यात आला.




### जे.एम.म्हात्रे चॅरीटेबल संस्थेचा स्तुत्य उपक्रम

या कार्यक्रमाच्या वेळी शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस गणेश कडू, नगरसेविका डॉ.सुरेखा मोहकर, प्रीती जॉर्ज म्हात्रे, सारीका भगत, कुसुम गणेश पाटील, मा.उपनगराध्यक्ष गणेश पाटील, शेकाप खांदा कॉलनी अध्यक्ष अनिल बंडगर, कार्याध्यक्ष योगेश कोटेकर, शेकाप महिला आघाडी अध्यक्ष दर्शना भडांगे, शेकाप महिला आघाडीच्या माधुरी गोसावी, शेकाप महिला आघाडी पदाधिकारी ,ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजिप शाळेत शिवजयंती उत्सव

**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळ्यातील राजिप शाळा तोंडरे येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री शिव छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आली.

प्रथम शाळेचे मुख्याद्यापक वाघ यांनी शिवाजी महाराज्यांच्या प्रतिमेचे पूजन केले. तद्नंतर पदवीधर शिक्षक वसंत मोकल, तुकाराम शिंदे, बालाजी जकाकुरे, महेंद्र जोशी, प्रभात नाईक आदी गुरुवयांनी प्रतिमेचे पूजन करून प्रणाम केला. यावेळी इयत्ता १ ली ते ८ वी च्या १९ मुलांनी मुलांनी भाषणातून छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवन कथन केले. काही विद्यार्थ्यांनी पाळणा आणि ओव्या कथन करून सर्वांना मंत्रमुग्ध केले.



अलिबाग तालुक्यातील नागाव येथे शनिवारी शिवजयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ढोलताशांच्या गजरात आणि शस्त्रास्त्रांच्या खेळाने छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देण्यात आली. या कार्यक्रमाला नागाव सरपंच निखिल मयेकर व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाचे आयोजन निखिल मयेकर मित्रमंडळाने उत्साहात केले होते.

## वकिलांनी रचला महाराजांवर पोवाडा



**। नेरळ । वार्ताहर ।**

कर्जत येथील दिवाणी न्यायालयात प्रॅक्टिस करणाऱ्या वकिलांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर पोवाडा रचला आहे. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या दिवशी महाराजांच्या जीवनावरील पोवाडा चित्रफीत प्रकाशन सोहळा कर्जत दिवाणी न्यायालयात पार पडला.

### छत्रपती शिवाजी महाराजांना दिली अनोखी मानवंदना

कर्जत येथील न्यायालयात वकिली करीत असलेले वकील शेलू येथील ॲड.संदीप बागडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आज नव्याने जागु दे महाराष्ट्राचा अभिमान हे गीत रचले आहे. त्या गीताला याच न्यायालयात वकिली करणारे तालुक्यातील पोही येथील वकील अजय भोईर यांनी स्वरबद्ध करून गायले आहे. या चित्रफितीचे प्रकाशन कर्जत दिवाणी न्यायालयात करण्यात आले.

त्यावेळी या न्यायालयाचे न्यायाधीश मनोद तोकले यांनी चित्रफितीचे प्रकाशन केले आणि शुभेच्छा दिल्या. न्यायालयात हा पोवाडा वकील अजय भोईर यांनी गाऊन दाखवत सर्व सहकारी वकिलांची वाहवा मिळविली. त्यावेळी ज्येष्ठ वकील राजेंद्र निगुडकर, तसेच अन्य वकील उपस्थित होते.

## गोखले महाविद्यालय शिवरायांना अभिवादन

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

येथील गोखले एज्युकेशन सोसायटीचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय श्रीवर्धनच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाराष्ट्राचे दैवत, कुलभूषण, छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आहे. यावेळी विविध विषयांवर निबंध स्पर्धा व कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

या प्रसंगी महाविद्यालयाचे एन.एस.एस. विभाग प्रमुख व इतिहास विभाग प्रमुख आणि ज्येष्ठ प्राध्यापक किशोर लहारे यांच्या हस्ते शिव प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी एनएसएस कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापक वाल्मिक जोंधळे, डॉ.कल्याणी नाझरे, राजीव गोरुले, योगेश लोखंडे, संतोष लंकेश्वर, वरिष्ठ लिपिक बाक्कर आदी मान्यवर सहभागी झाले होते.






**१.नेरळ**
छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेमध्ये अभिवादन करण्यात आले. पालिकेच्या वतीने पालिकेच्या मुख्याधिकारी आणि प्रशासक सुरेखा भणगे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

**२.मुरुड**
मुरुड भंडारवाडा युवक मंडळातर्फे शिवजयंती निमित्ताने भव्य मिरवणुकीसह शिवकालीन रूपे साकारून मिरवणूक काढण्यात आली.

**३. पनवेल**
खांदा वसाहतीच्या सकल मराठा यांच्या तर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. यावेळी खास महिलांनी लाठीकाठी प्रात्यक्षिके सादर केली.

**४.श्रीवर्धन**
श्रीवर्धन तालुक्यात मावळा प्रतिष्ठानतर्फे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी झाली. यावेळी बोर्ली पंचतन येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मर्दानी खेळ सादर करताना.

**५.कर्जत**
छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस नगराध्यक्ष सुवर्णा जोशी अभिवादन करताना.

**६. मुरुड**
मुरुड नगरपरिषदेतर्फे शिवजयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवान करताना.

# छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण

## विविध कार्यक्रमांचे आयोजन; महाराजांच्या घोषणांनी परिसर गेला दुमदुमून



**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील चिर्ले ग्रामपंचायत हद्दीतील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या प्रांगणात आर्यन इन्टरप्रायजेसच्या माध्यमातून शिवजयंती सोहळ्याचे औचित्य साधून बसविण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा अनावरण सोहळा सुधाकर पाटील व मिनाक्षी सुधाकर पाटील, समिर पाटील यांच्या हस्ते विधिपूर्वक पूजा करून पार पडला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सव सोहळ्याचे औचित्य साधून उरण शहरात छत्रपती युवा संघाच्या माध्यमातून भव्य दिव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच शाळेतील विद्यार्थी परिसरातील महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रमाबरोबर प्रबोधनकार संजीवन म्हात्रे यांच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने परिसर दुमदुमून गेला होता.

श्री महागणपती तीन आसनी ऑटो रिक्षा चालक मालक संस्था चिरनेरच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सव सोहळ्याचे औचित्य साधून श्री सत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले होते.तसेच चिरनेर ते कोप्रोली, दिघाटी येथे मोफत रिक्षा मधून प्रवाशांसाठी मोफत प्रवासाचे आयोजन करण्यात आले होते. एकंदरीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सव सोहळ्याचे औचित्य साधून ठिकठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)